माझ्या आणि तुमच्यामधील आध्यात्मिक अंतर सतत मनन आणि अध्ययन करून तोडण्याचा प्रयत्न करा; म्हणजे तुमची आत्मिक पातळी हळूहळू उंच होत असल्याचा तुम्हाला अनुभव येईल. अल्ला-मालिक हाच सर्वांचा रक्षणकर्ता आहे. आपल्या ऋणानुबंधाने आपण जवळ आलो आहोत; तेव्हा सर्वांबरोबर शांततेने आणि प्रेमाने वागणे, हेच सर्व धर्मांचे सार आहे. सर्व भक्तांनी शांततेचा पुरस्कार करावा.''

● ''आपले पंचप्राण, इंद्रिये, मन, बुद्धी आणि देहाभिमानी आत्मा या सर्वांचा त्याग केल्याशिवाय ब्रह्मज्ञानाचा मार्ग समजणार नाही.''

(संकलित)

चरितं रघुनाथस्य शतकोटि प्रविस्तरम्।
केकं अक्षरं पुंसा महापातकनाशकम्।।

रामेति रामभद्रेति रामचन्द्रेति वा स्मरत्।
नरो न लिप्यते पापैः मुक्तिं भुक्तिं च विंदती।।

(रामरक्षा)

टीप - 'श्री साईगीतायन' व 'शिरडीस साई आले' याबद्दल बऱ्याच वाचकांची पृच्छापत्रे आली आहेत. पहिले पुस्तक प्रकाशक के. भि. ढवळे, भटवाडी, गिरगांव, मुंबई-४०० ००४. येथे उपलब्ध असून दुसरी कॅसेट व्हिनस कॅसेटच्या विक्रेत्याकडून मिळू शकते.

# नामाची ध्वजा लावील मंदिरी

पहाटेची वेळ, आहे मोठी गोड
रहस्यांची होईल फोड, आयुष्याच्या
तिच्या आधीन होऊन, जो अंथरूणी पडेल
तो अडकूनी पडेल, मनोराज्यांच्या
झोपेला सोडून, जो होईल जागा
तो फुलवील बागा, स्वर्गाच्या
त्यावेळी घ्या, हृदयी नाम
डुंबू द्या डोहांत आत्माराम, आनंदाच्या
मनानेच मग करा मानसपूजा
देव फुला-फळाने पूजा, भावाच्या
भक्ति-पूजेचा, हा नित्य पाठ
सोडवील कर्मभोगांची गाठ, जन्माच्या
कस्तुरीमृग हा, ज्याला गवसला
त्याला देव गवसला, समाधानाचा
चढेल मग तो, स्वर्गाची पायरी
नामाची ध्वजा लावेल मंदिरी, मोक्षाच्या

- श्री. भालचंद्र केशव गन्द्रे
चेंदणी, ठाणे (प.).

---

## दुःखद निधन

सर्व साईभक्तांना कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की, शुक्रवार, दिनांक २ मार्च १९९० रोजी रात्री सव्वाआठ वाजता श्री साईसत्‌चरितकार (हेमाडपंत) यांचे चिरंजीव डॉ. दाभोलकर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, ही श्री साईचरणी प्रार्थना.

---

# साई-राम

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।।७।।
परित्राणाय् साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।८।।

अशाप्रकारे भगवंतांनी श्रीमद्‌गभवद्‌गीतेच्या ४थ्या अध्यायात आश्वासन दिलं आहे की, जेंव्हा जेंव्हा अनीतीची नीतीवर, अन्यायाची न्यायावर, असत्याची सत्यावर कुरघोड होईल, थोडक्यात, समाजात धर्म अस्ताला जाऊन अधर्म बोकाळेल, तेंव्हा तेंव्हा मी ह्या भूतलावर अवतार घेईन. ह्या वचनाला अनुसरुन अंध:कारलेल्या जीवांत प्रकाश आणण्यासाठी भगवंतांनी श्री रामरुपात व श्री साईरुपात ह्या धरतीवर वास केला. साक्षात् परमेश्वर जरी असले, तरी मानवी-जीवन धारण केल्याने त्यांनी ह्या मानवलोकात माणसासारखेच वर्तन केले; परंतु त्यांचे जीवन हे सर्वसामान्यांसारखे मात्र नव्हते, तर ते एक त्यागीवृत्तीचे, इतरांना आदर्श घालून देणारे होते. म्हणूनच कित्येक वर्षे लोटली, तरी ह्या अवतारी पुरुषांच्या जीवनाचं वाचन, श्रवण, चिंतन केलं जात आहे. मर्यादा पुरुषोत्तम श्री रामांच्या त्यागमय जीवनाचे अनेक प्रसंग जसे







रामायणात आढळतात, तसेच श्री साईंच्या निरपेक्षवृत्तीच्या कित्येक घटना श्री साईसत्‌चरितात अवलोकायला मिळतात. श्री रामांच्या व श्री साईंच्या परोपकारी जीवनात असलेली बरीचशी साम्यस्थळं आपल्याला रामायणात व श्री साईसत्‌चरितात वाचावयास मिळतात. त्यातील पुढील दोन उदाहरणे यासाठी पुरेशी बोलकी आहेत. रामभक्त शबरीने चाखलेली उष्टी बोरं जशी श्री रामांनी अवीट गोडीने खाल्ली, तशीच कुष्ठरुग्ण साईभक्त भागोजी शिंदे यांनी केलेली सेवा श्री साईंनी अत्यानंदाने स्वीकारली. हे पहिलं उदाहरण त्यांच्या भक्तांवरील उत्कट प्रेमाचं दर्शन घडवितं. आता दुसरं उदाहरण बघू. कुठल्यातरी व्याधीने पिडलेल्या वाघाला श्री साईंनी मुक्ती दिली, तर श्री रामांनी जखमी अवस्थेत विव्हळत असलेल्या जटायुचे डोके आपल्या मांडीवर घेऊन त्याच्या आत्म्याची देहातून सुटका केली. या उदाहरणावरुन ह्या दोघांचं प्राणीमात्रांवरील अपूर्व प्रेम दिसून येतं.

# श्री साईनामाचा महिमा

- श्री. सूर्यकांत मा. गर्जे
गोखले नगर, पुणे.


भक्तीचे नानाविध प्रकार अस्तित्वात आहेत. अध्यात्म क्षेत्रातील भक्ती ही जितकी निर्व्याज, निर्मळ आणि निरहंकारी असेल, तितकी ती भक्ताच्या विकासासाठी पूरक ठरते; किंबहुना, अशा भक्तींतून निर्माण होणारी निरागस शक्ती भक्ताला कोणत्याही संकटसमयीं तारक ठरत असते. भय, दु:ख अशाप्रकारचे कोणतेही शल्य भक्ताला स्पर्शही करू शकत नाहीत.

श्री साईनाथ महाराज हे भक्ताच्या उद्धारासाठी अहोरात्र जागृत असतात. श्री साईचा वरदहस्त सदैव आपल्या शिरी असावा, असे वाटत असेल, तर मनात भक्तीचा दीप अखंड तेवत ठेवला पाहिजे. साईनामाचा मंत्र जपून तो प्रज्वलित केला पाहिजे.

साईनामाचा महिमा अवीट आहे. तो सांगून वर्णन करता येणार नाही. त्याची अनुभूति घेणे आवश्यक आहे किंवा अनुभवानेच तो सिद्ध होऊ शकेल, असे गृहीत धरले, तर साईनामाचा मंत्र हे एक प्रभावी साधन होऊ शकेल. साईनामाचा मंत्र जपणे, ही अत्यंत साधी-सोपी, सहज-सुलभ अशी आराधना-पद्धत आहे. या आराधनेद्वारे भक्ताला निश्चितच रसाळ फळे चाखावयास मिळतील.

सर्व ऐहिक सुखे ही नश्वर आहेत; परंतु मनाला विकसित करणारे सुख, हेच खऱ्या अर्थाने शाश्वत सुख आहे आणि या सुखाच्या प्राप्तीसाठी आवश्यक आहे साईनामाचा अखंड-जप.

दसरा-महोत्सवाच्या निमित्ताने मला शिर्डीला जाण्याचा अलभ्य योग आला. नित्याप्रमाणे द्वारकामाईच्या ओसरीवर मी निश्चल मनाने श्री बाबांच्या तसविरीकडे पहात शांतपणे बसलो होतो. मुंबईचे एक साईभक्त माझ्याजवळ येऊन बसले. ओळख झाली. गप्पा सुरू झाल्या. अर्थात, विषय होता, ''परमपूज्य श्री साईनाथ महाराज.'' ओघाओघाने विषय निघाला, श्री साईनामाचा महिमा. साईनामाचा मंत्र जपणे, याबाबत आमचे एकमत न होण्याचा प्रश्नच नव्हता. बसता-उठता, इतकेच नव्हे, तर निद्रावस्थेंत सुद्धा श्री साईनामाचा मंत्र जपता आला पाहिजे. शरीराच्या रंध्रारंध्रातून श्री साई... श्री साई, असा उद्घोष झाला पाहिजे. कपाळावरून ओघळणाऱ्या घामातून, तसेच शरीरातील नसानसातून धावणाऱ्या रक्तातून श्री साईचा उच्चार-पुनरूच्चार झाला पाहिजे. बरे, ही गोष्ट सहज सोपी नाही, तसेच अशक्यपण नाही. यासाठी सरावाची आणि



सवयींची आवश्यकता आहे.

प्राणाशिवाय शरीर नाही; तद्वत्, श्री साईनामाशिवाय साईभक्त असणे, असंभवनीय आहे. प्रत्येक साईभक्त श्री साईचे सदैव स्मरण करीत असतो. श्री साईच्या समीप जावयाचे असेल, तर श्री साईनामाच्या मंत्राची कास धरली पाहिजे. पाण्यात शरीर झोकून द्यावे, तसे श्री साईनामाच्या मंत्रघोषात स्वत:ला विसरून गेले पाहिजे.

"ॐ श्री साईनाथाय नम:" हा केवळ एक जप नव्हे, तर ती एक सुप्तावस्थेतील शक्ती आहे. या मंत्राचा नित्यनियमाने जप केला, तर ही शक्ती जागृत होईल, जीवन सार्थकी लागेल.

## भजन म्हणा भजन म्हणा

भजन म्हणा भजन म्हणा
साई देवाचें भजन म्हणा ॥धृ.॥
टाळ कुटिलें अभंगी
भजन गायिलें अभंगा ॥
घोषा मंत्र गुरुस्वामी
जपा मंत्र साईनाथ ॥
देहभाव शांत होता
साईदेव तृप्त झाले


- श्री. श्याम दत्ताराम नर्से
वागळे इस्टेट, ठाणे.

# श्री साईंचे सत्य चरित्र-अध्याय ५ वा

–सटिक गद्य अनुवाद :–
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
वंड गार्डन रोड, पुणे.

(मागील अंकावरून पुढे चालू)

आरंभी साईसमर्थांना दिवे लावण्याची किंवा रोशनाई करण्याची मोठी हौस असे. त्यासाठी ते स्वतः दुकानदारांकडे तेल मागायला जात असत. टमरेल हातात घेऊन वाण्या-तेल्याच्या दुकानातून स्वतः तेलाची भिक्षा मागत. ते तेल आणून पणत्यांत (तेल व वात घालून दिवा पेटविण्याचे पसरट मातीचे पात्र) भरीत असत आणि मशिदीत आणि देवळात झगझगीत पणत्या (दिवे) पेटवीत असत. असे हे काही दिवसपर्यंत सतत (सदोदित) चालले. दिव्यांची पूजा (दीप+आराधना) करण्याची बाबांना फार आवड. दिवाळीची रोशनाई (दीपोत्सव) देखील ते करीत. चिंध्या काढून (स्वतः) वाती वळीत आणि मशिदीत दिवे पेटवीत. रोज ते तेल फुकट आणीत. (परंतु एकदा) वाण्यांच्या मनात लवाडी (कपट) आली व सर्वांनी मिळून कट केला की, आता ही कटकट पुरे. मग दररोजच्या नियमाप्रमाणे बाबा तेल मागण्यास गेले असता, सर्वांनी नाही म्हटले असता, मोठे आश्चर्य घडले. बाबा न बोलता (निमूटपणे) परत गेले व पणत्यात सुकेच काकडे ठेवले. तेल नसता आता ते काय करतात, याची मौज वाणी पाहू लागले. बाबांनी मशिदीच्या चौथऱ्यावरील (जोत्यावरील) टमरेल उचलून घेतले. त्यात थोडेसे (इवलेसे) तेल होते. मोठ्या कष्टाने (त्रासाने) सांजवात (संध्याकाळी देवापुढे लावण्याचा दिवा) पेटविली जाईल, त्या तेलात (बाबांनी) पाणी घातले व ते स्वतः पिऊन गेले. अशाप्रकारे ते ब्रह्मार्पण (परमेश्वराला अर्पण) करून त्यांनी निव्वळ (फक्त) पाणी घेतले, मग ते पणत्यांत ओतून सुके काकडे पूर्णपणे भिजवून त्यांना काड्या ओढून लावल्या आणि दिवे पेटवून दाखविले. असे ते पाणी पेटलेले पाहून वाण्यांनी (आश्चर्याने) तोंडात बोटे घातली व मनात म्हणू लागले की, आपण बाबांशी खोटे बोललो, हे फार वाईट केले (ओखटे). अगदी थोडेसेही (अणुमात्र) तेल नसताना सर्व रात्रभर पणत्या जळाल्या. सर्व लोक म्हणू लागले की, वाणी साईबाबांच्या दयेच्या लायकीचे नाहीत (त्यांना शिक्षा झालीच पाहिजे). वाण्यांना पश्चात्ताप होऊ लागला की, केवढे हे बाबांचे सामर्थ्य (प्रताप), आपण मात्र खोटे बोलून पाप जोडले आणि बाबांना व्यर्थ संताप दिला. (परंतु) बाबांच्या तर हे ध्यानीमनी नव्हते. लोकांप्रित्यर्थ त्यांचे राग किंवा द्वेष धरणे नव्हते (नाकळे). त्यांना कोणी शत्रू किंवा मित्र नव्हता. सर्व प्राणी त्यांना सारखे होते. (ओ. १०१-११४)



असो. आता पूर्वानुसंधानाने मोहिद्दीन कुस्तीत यशस्वी झाल्यापुढील चरित्राचा महिमा लक्ष देऊन ऐका. कुस्तीनंतर पाचव्या वर्षी अहमदनगरचा राहणारा एक फकीर, ज्याचे नाव 'जव्हारअल्ली' होते, तो शिष्यांसह रहात्याला (शिरडीपासून ११। मैलावर अहमदनगरच्या रस्त्यावर असलेले गाव) राहण्यासाठी आला. एक उघडी मोकळी जागा (बखळ) पाहून वीरभद्राच्या (दक्षयज्ञाचा विध्वंस करण्यासाठी श्री शंकराने आपल्या जटेपासून निर्माण केलेला वीरपुरुष) देऊळाजवळ त्या फकिराने तळ दिला (मुक्काम केला). हा फकीर खरोखर भाग्यवान (दैवाचा) होता. जर तो तसा नसता, तर सर्वत्र प्रसिद्धी पावलेल्या (डंका जयाचा सर्वत्र) साईसारखा मौजेचा शिष्य त्याला कसा लाभला असता ? गावात बरेच लोक होते ; त्यात कित्येक मराठे (क्षत्रिय जातीचे) होते. त्यातील एक भगू सदाफळ नावाचा माणूस त्याचा सेवक झाला. फकीर मोठा पढीक (विद्वान) होता. कुराण शरीफ (मुसलमान धर्माचा पवित्र ग्रंथ) हातात असलेल्या आवळ्याप्रमाणे (करतल+आमलक) त्याला स्पष्ट होते. स्वार्थी, परमार्थी आणि भाविक असे अनेक लोक त्याचे चरणी लागले. (फकिराने) तेथे इदगा (नमाज पढण्याची जागा) बांधण्यास सुरुवात केली. (परंतु) काही दिवसांनंतर त्याच्यावर वीरभद्र बाटविल्याचा आरोप आला आणि इदगा बांधणे बंद पडले. (गावलोकांनी) फकिराला गावाबाहेर घालविला. मग तो शिरडीस आला आणि बाबांजवळ मशिदीत राहिला. फकीर मोठा गोड बोलणारा (मृदुभाषणी) होता. (सारा शिरडी) गाव त्याच्या भजनी लागला. बाबांनादेखील त्याने काही करणी (जादूटोणा) करून मोहिनी घातली (भूल पाडली, वश केले), असे लोक म्हणू लागले. तो बाबांना म्हणाला, "तू माझा चेला (शिष्य) हो." बाबांचा स्वभाव भारी विनोदी (बहु रंगेला). त्यांनी 'हो' म्हटल्याबरोबर त्याला फार आनंद झाला आणि बाबांना बरोबर घेऊन तो निघाला. बाबांसारखा खंबीर (सधरू) शिष्य आणि जव्हारअल्ली त्याचे गुरु झाले. दोघांचा रहात्यात राहण्याचा विचार झाला. गुरुला शिष्याच्या कळेची (चतुराईच्या योजनेची) कल्पना नव्हती. (परंतु) शिष्याला गुरुच्या अवकळेची (निस्तेजाची किंवा अनधिकाराची) कल्पना होती. परंतु शिष्याने (साईबाबांनी) त्यांचा केव्हाही उपमर्द (अनादर) केला नाही व आपला शिष्यधर्म पाळला. गुरुमुखातून जे जे वचन बाहेर आले, त्याची योग्यता किंवा अयोग्यता पाहिली नाही व ते वरचेवर झेलले (तक्रार न करता आज्ञा पाळली). गुरुच्या घरी पाणीदेखील वाहीले. (ओ. ११५-१२७)

अशाप्रकारे बाबांची गुरुसेवा चालली. शिरडीत केव्हातरीच ते येत असत. असे जेव्हा वारंवार होऊ लागले, तेव्हा मग काय घडले पहा. पुढे बाबा रहात्यासच राहू लागले. फकिराच्या फारच नादी लागले आणि (बाबा) आता शिरडीला अंतरले (शिरडी सोडून गेले), असे (सर्वांना) वाटले. गावलोकांची कल्पना झाली की,

जव्हारअल्ली आपल्या योगसामर्थ्याने साईबाबांना बांधून ठेवत आहे (आकळी). परंतु साईबाबांची कळा (योजना) वेगळीच होती. ते आपल्या देहाचा अभिमान जाळीत होते. श्रोते सहज तर्क (अनुमान) करतील की, साईबाबांना अभिमान कोठून आला? पण हे आचरण (वागणे) लोकसंग्रहाकरिता (लोकांनी आचारभ्रष्ट होऊ नये, म्हणून स्वत:ची इच्छा नसता किंवा स्वत:ला त्याची जरुरी नसता काही आचारांचा स्वीकार करणे) होते व हेच त्यांचे अवतार घेण्याचे कारण (अवतरण+कार्य) होते. शिरडीत जे बाबांचे प्रेमी भक्त होते, त्यांचा बाबांवर फार लोभ (अति आसक्ति) होता. त्यांना बाबांपासून वेगळे (वियुक्त) राहणे अयोग्य (अयुक्त) वाटले. जव्हारअल्लीच्या सर्वस्वी आधीन झालेले त्यांना पाहून गावकऱ्यांचे मन उद्विग्न (चिंताक्रांत) झाले आणि त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे चालणारे (स्वाधीन) कसे करावे, या विचारात ते गढून गेले (निमग्न जाहले). जैसे सोने व त्याची चमक (कांति) किंवा दिवा व त्याचा उजेड (दीप्ति), तशीच या गुरुशिष्यांची स्थिती होती व त्या दोघांनाही ऐक्याचा तसाच अनुभव (प्रतीति) येत होता. मग ते शिरडीचे भक्तमंडळ रहात्याला इदग्याजवळ गेले आणि (बेत करू लागले की) मोठा (प्रबळ) प्रयत्न करून पाहू या आणि बाबांसकट सगळे मग परतू या. परंतु बाबांनी त्यांना उलट समज (बुध्दी) दिली. (ते म्हणाले) "फकीर महा रागीट आहे. त्याचे नादी लागू नका. तो मला कधीच सोडणार नाही (न विसंबे). तुम्ही येथून पळून जा. तो गावातून आताच येईल आणि तुमचा सत्यानाश (नि:संतान) करेल. त्याचा क्रोध फार उग्र आहे. त्याचा राग मोठा कडक आहे. येताच तो (रागाने) लालभडक होईल. तुम्ही तडक (लगेच) येथून निघून जा आणि शिरडीची सडक (वाट) धरा." भक्तजन म्हणू लागले की, आता काय करावे? बाबा तर अशी उलटी गोष्ट सांगतात? इतक्यात अचानक (अवचित) तो फकीर आला आणि विचारता (पुसता) झाला, "पोरासाठी आलात काय? गोष्टी कसल्या करीत होता? त्याला शिरडीला माघारी नेण्याच्या कष्टात पडू नका." असे जरी तो आधी बोलला, तरी गावकऱ्यांपुढे तोही कचरला (माघार घेतली) आणि म्हणाला, "चला, मुलाला शिरडीला नेऊ या. बरोबर मलाही घेऊन चला." अशाप्रकारे तो फकीर सर्वांबरोबर पुन्हा (शिरडीत) आला. त्याला बाबांना सोडवेना आणि बाबांनाही त्यापासून दूर राहवेना (न विसंबवणे). तेव्हा हे कसे काय शक्य होईल (संभवे), ते (कोणालाच) कळत नव्हते. (ओ. १२८-१४२)

साई परब्रह्माचा पुतळा (साक्षात् परब्रह्म), तर जव्हारअल्ली भ्रमाचा भोपळा (पोकळ बुडाशिवायची किंवा चुकीचा ग्रह झालेली व्यक्ती). देवीदासाने तो कसास लावला (परीक्षा घेतली) आणि शिरडीत (जव्हारअल्लीचा) भोपळा फुटला (चुकीच्या कल्पनेचे निरसन झाले). देवीदासाचा बांधा सुंदर, डोळे सतेज आणि रूप मनोहर

होते. दहा-अकरा वर्षांचा असताना तो प्रथम शिरडीत आला होता. असा तो लहान वयाचा आणि कंबरेला फक्त एक लंगोटी नेसलेला तीर्थवासी (पवित्र क्षेत्री राहणारा गोसावी) मारुतीच्या देवळांत उतरला होता. अप्पा भिल्ल व म्हाळसापती त्याच्याकडे जात-येत असत. काशिराम शिंपी वगैरे त्याला शिधा (स्वयंपाकासाठी लागणारे डाळ, तांदूळ वगैरे) देत असत. (अशाप्रकारे) त्याचे महत्त्व वाढले. (लग्नाच्या) वऱ्हाडाबरोबर बाबा आले. त्याच्या आधी बारा वर्षे देवीदास शिरडीत येऊन प्रथम बसते झाले (राहिले). अप्पा भिल्लाला (ते) पाटीवर शिकवीत असत, व्यंकटेश स्तोत्र (मराठी भाषेतील एक प्रमाणभूत आणि प्रभावी १०८ ओव्यांचे स्तोत्र. भगवान विष्णूंचे हे करूण स्तवन देवीदास नावाच्याच एका चैतन्यसंप्रदायी पुरुषाने रचलेले आहे) पढवून सर्वांकडून तोंडपाठ (मुखोद्गत) म्हणवून घेत असत व नित्यनियमाने अभ्यास (पाठ) चालवीत असत. हे (देवीदास) मोठे ज्ञानीपुरुष होते. तात्याबाने (तात्या गणपत कोते पाटील) त्यांचे गुरुत्व घेतले आणि काशिराम शिंपी वगैरे मुख्य (अग्रणी) शिष्य होऊन त्यांना शरण गेले (चरणी लागले). (या लोकांनी) त्यांच्यापुढे तो फकीर आणला आणि शास्त्रीय वादविवाद मांडला. वैराग्याने (देवीदासाने) तो फकीर जिंकला आणि तेथून हाकून लावला. तो मग तेथून जो निसटला, तो वैजापुराला (औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्याचे गाव) जाऊन राहिला. पुढे कित्येक वर्षांनी तो शिरडीस आला आणि साईनाथांना (नम्रपणे) नमस्कार करता झाला. आपण गुरु व साई आपला चेला (शिष्य) हा त्याचा सर्व भ्रम नाहीसा झाला (निरसला) व पश्चातापाने शुद्ध झाला. बाबांनीही पूर्वीप्रमाणे त्याचा सन्मान (सत्कार) केला. (ओ. १४३-१५१)

अशी बाबांची अगाध लीला आहे. निर्णय (निवाडा) व्हावयाचा तेव्हा झाला, परंतु तो गुरू आणि आपण चेला, ही भावना तोपर्यंत चालू ठेवली (भाव आदरिला). त्याचे गुरुपण त्याला व आपले चेलेपण आपणाला, हाच येथील एक उपदेश साईनाथांनी स्वत: आचरणात आणला. आपण कोणाचे होऊन रहावे किंवा कोणाला आपले करावे, या शिवाय असणे चांगले (बरवे) नव्हे. त्याशिवाय मोक्ष प्राप्त करणे शक्य नाही (न उतरवे परपार). बाबांच्या वागणुकीत (वर्तनी) हाच एक धडा (बोध) आहे. परंतु ज्याच्या मनाचा निश्चय (धडा) क्वचित आढळणारा (दुर्लभ) असा ठाम (निधडा) असेल, तोच निरभिमानरूपी गडावर (डोंगरावर बांधलेल्या किल्ल्यांवर) चढू शकेल. येथे स्वत:च्या बुद्धीने मांडलेली (परिकल्पित) चतुराई (शहाणपण) कामाला येत नाही. ज्याला आपले स्वत:चे हित (कल्याण) साधावयाचे असेल, त्याने अभिमान सोडून वर्तन ठेवावे. ज्याने देहाचा अभिमान जाळला, त्यानेच हा देह सार्थकी (योग्य कारणी) लावला. तो मग परमार्थ साधावयाला कोणाचाही चेला (शिष्य) होईल. (बाबांची) ही निर्विषय (ऐहिक विषयांवर आसक्ती नसलेली) स्थिती


पाहून सर्व लहानमोठे लोक मनात आश्चर्यचकित होऊन त्या लहान वयाच्या देखण्या मूर्तीचे कौतुक करू लागले (चोज करिती जन सारे). (ओ. १५२-१५९)

ज्ञानीजनांचे देह-व्यापार (शरीराचे व्यवहार) पूर्वजन्मीं केलेल्या कृत्यांप्रमाणे (पूर्व+कर्म+अनुसार) असतात. त्यांना प्रारब्ध कर्मांचे (चालू जन्म येण्यास कारणीभुत होणारी व ह्या जन्मात भोगावयाच्या सुखदु:खांचे भोग ठरवून देणारी अशी पूर्वीच्या जन्मातील बरीवाईट कर्मे) ओझे (वाटत) नसते. कर्मांचे कर्तृत्व (कर्म कर्तार) घेणे, त्याला मान्य नसते (हो नेणे). जर सूर्याला अंधारात प्रवेश (रिघाव) मिळू शकेल, तरच ज्ञानी पुरुषाला द्वैत भाव (ब्रह्म व जग किंवा जीवात्मा व परमात्मा हे भिन्न आहेत, असे मत) असेल. ज्यांना अवघे (सर्व) विश्व हे आपलेच रूप (स्वरूप) वाटते, त्यांचा अद्वैताच्या (ब्रह्म व जग, जीव व शीव, म्हणजे परमात्मा ही एकच आहेत, असे मत) ठिकाणीच मुक्काम असेल (वसता ठाव अद्वैत). (ओ. १६०-१६१)

हे गुरु-शिष्यांचे आचरित (वागण्याची चालरीत) साईनाथांचे परमभक्त म्हाळसापती यांनी ऐकविले ; तसेच मी संपूर्ण (स+आदि+अंत) कथन केले. असो. आता हे आख्यान (कहाणी) पुरे. यापुढील चरित्र याहीपेक्षा गहन (गूढ) आहे. ते यथानुक्रमे सांगितले जाईल. ते ऐकावयाला सावध व्हा. मशीद पूर्वी कशी होती, किती प्रयत्नांनी त्यात फरशी बसविली गेली, साई हिंदू की मुसलमान (यवनवंशी), हे नक्की (भरवंशी) कोणालाच कळत नव्हते (नेणवे). धोतीपोती (हटयोगाच्या साधनांपैकी पोटातील आंतडी शुद्ध करण्याचा प्रकार), खंडयोग (हटयोगातील साधनांपैकी शरीराचे तुकडे तुकडे करून पुन्हा ते जोडण्याचा प्रकार) साई करत आणि भक्तांचे भोग (नशीबातील भोगण्याचे रोग किंवा पीडा) ते स्वत: भोगत. या सर्वांचे निवेदन काहीही न्यून न ठेवता (यथासांग) चांगल्या प्रकारे (चांग) पुढे होईल. हेमाड साईबाबांना शरण जात आहे, हे कथेचे वर्णन, म्हणजे त्यांचा चरणप्रसादच आहे. या पुण्यपावन कथेच्या श्रवणाने (भक्तांची) संकटे दूर (दुरित निवारण) होतील. (ओ. १६२-१६६)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या भक्त हेमाडपंतांनी रचलेल्या श्री साईसमर्थ यांच्या सत्य चरित्राचा "श्री साई-पुन: प्रकटीभवनं" (श्री साईंचे शिरडीत पुन्ह: प्रकट होणे) नावाचा पाचवा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरू साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**



# श्री साईबाबांची भक्ती व त्यांची शिकवण

- श्री. आंतोन शायेर फर्नांडिस
वेंगुर्ला, सिंधुदुर्ग.

....जे लोक अनन्यभावाने माझे चिंतन करतात, त्यांचा योगक्षेम मी वाहतो ; म्हणजेच त्यांची सर्वप्रकारची काळजी मी करतो....

**मायेच्या तावडीतून सुटण्यास नाम हेच साधन-**

कित्येकांना परमेश्वराची भक्ती करावी, त्याचे नामस्मरण करावे, असे मनापासून वाटत असते ; पण काही ना काही कारणाने ते घडत नाही. असे का व्हावे ? तर माया आड येते. मायेला बाजूला सारून भगवंतापर्यंत कसे पोहोचायचे ? माया ही भगवंताच्या सावलीसारखी आहे. तिला सोडून तू ये असे म्हणणे, म्हणजे भगवंतालाच तू येऊ नकोस, असे म्हणण्यासारखे आहे. कारण एखाद्या इसमाला 'तू ये, पण तुझी सावली आणू नको' म्हटले, तर ते कसे शक्य आहे ? म्हणून माया ही राहणारच. आपण तिच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत कसे पोहोचायचे, हाच प्रश्न आहे आणि या प्रश्नाचे उत्तर एकच, ते म्हणजे भगवंताचे नाम घेणे. नामानेच मायेच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत जाता येते. जसे व्यक्तिशिवाय सावलीला अस्तित्व नाही, तसेच मायेला स्वतंत्र अस्तित्व नाही.

सत्व, रज, तम या गुणमय तीन विकारांनी हे सर्व जग मोहून गेले आहे. म्हणून या गुणांच्या पलीकडे असलेला अविनाशी असा जो 'मी (भगवंत),' त्या मला हे जाणत नाही. सर्व प्राणी हे माझेच अवयव आहेत ; परंतु मायेच्या योगाने जीवपणाला पावले. हे प्राणी माझ्यापासून उत्पन्न झाले असून मद्रूप होत नाहीत, माझेच असून मला ओळखित नाहीत व 'मी' आणि 'माझे' या भ्रांतीने विषयांध झालेले असतात, असे भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात.

विषयी पुरुषाला स्त्री जिंकवत नाही, त्याप्रमाणे ही मायारुप नदी जीवाला तरवत नाही ; परंतु जे मला अनन्यभावाने शरण येतात, ते ह्या दुस्तर नदीतून सहज तरून जातात. ज्यांना सद्गुरु हाच नावाडी असून, ज्यांनी ब्रह्मसाक्षात्काराची कास बळकट धरली आहे व ज्यांना आत्मनिवेदन हेच तारू सापडले आहे, जे अहंभावाचे ओझे टाकून, विकल्परुपी वारा चुकवून आणि बायकामुलांच्यावरील प्रेमरूपी पाण्याची धार टाळून, जीवात्म्याचे ऐक्य हाच उतार, त्या उताराने बोधरुपी सांगडीच्या आश्रयाने निवृत्तीच्या पलीकडील काठाला जाऊन पोहोचतात, ते वैराग्यरुप हात टाकीत 'अहं

ब्रह्म' या भावाच्या वळावर पोहून मुक्तितटावर अचूक निघतात. या उपायाने जे मला भजतात, तेच भक्त या मायारूप नदीतून तरून जातात ; परंतु असे भक्त विरळच !

आपल्या हिताकरिता हवा तो मनुष्य ईश्वराची भक्ती करतो; परंतु ईश्वर ज्याच्यावर प्रेम करतो, असा भक्त ज्ञानीच होय ! असे पहा, दुधाच्या आशेने सर्व लोक गाईला चारा घालतात; परंतु तीच गाय आपल्या वासराला चाऱ्याशिवाय दूध पिऊ देते. कारण काय, तर त्याला दुसरी काहीएक गोष्ट माहीत नसून आपल्या तन-मन व प्राणाने ते वासरू आपल्या आईलाच ओळखत असते आणि जी वस्तू नजरेत येईल, ती माझी आई, असे समजते. अशाप्रकारे ते वासरू अनन्य भक्त असते, म्हणून गायही त्याच्यावर तसेच प्रेम करते.


अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥२२॥ भगवद्गीता, अध्याय ९

हजारो वर्षांपूर्वी भगवद्गीतेमध्ये श्रीकृष्णांनी सांगितले आहे, तेच साईबाबांनी सांगितले आहे. जे लोक अनन्यभावाने माझे चिंतन करतात, त्यांचा योगक्षेम मी वाहतो; म्हणजेच त्यांची सर्वप्रकारची काळजी मी करतो.

श्री ज्ञानेश्वरीमध्ये श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

"ऐसे अनन्यगतिकें चित्तें। चिंतितसांते मातें।
जे उपासिती तयातें। मीचि सेवीं॥३७॥
ते एकवटूनि जिये क्षणीं। अनुसरले गा माझिये वाहणीं।
तेव्हांचि तयांची चिंतवणी। मजचि पडली॥३८॥
मग तींहीं जें जें करावें। तें मजचि पडिलें आघवें।
जैसी अजात पक्षाचेनि जीवें। पक्षिणी जिये॥३९॥
आपुली तहान भूक नेणें। तान्हयानिकें तें माउलीसीचि करणें।
तैसें अनुसरले जे मज प्राणें। तयांचें सर्व मी करीं॥४०॥
तया माझिया सायुज्याची चाड। तरि तेंचि पुरवीं कोड।
कां सेवा म्हणती तरी आड। प्रेम सूत्रें॥४१॥
ऐसा मनीं जो जो धरिती भावो। तो तो पुढां पुढां लागे तयां देवों।
आणि दिधलियाचा निर्वाहो। तोही मीचि करीं॥४२॥
हा योगक्षेमु आघवा। तयांचा मजचि पडिला पांडवा।
जयांचिया सर्वभावा। आश्रयो मी॥४३॥ —श्री ज्ञानेश्वरी, अध्याय ९

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, "असे जे एकनिष्ठ होऊन माझी चिंतनरूपी उपासना करितात, त्यांची सेवा मी करतो. ते ज्या क्षणी एकनिष्ठ होऊन माझ्या मार्गाला



लागले, त्याच क्षणी त्यांच्या सर्व काळजीचा बोजा माझ्या अंगावर पडला. मग, जे जे त्यांनी करण्याचे मनात आणावे, ते ते सर्व मलाच करावे लागते.

ज्याप्रमाणे पंख न फुटलेल्या पिलांच्या जीवाकरिता पक्षिणीच सर्व खटपट करते; आपली तहानभूक जरी लेकराला समजत नाही, तरी त्याला जे हितकर असेल, ते जसे आईलाच करावे लागते, त्याचप्रमाणे अंत:करणपूर्वक जे मला शरण आले, त्यांचे सर्व काम मी करतो. त्यांना जर माझ्या सायुज्यसुखाची इच्छा असेल, तर त्यांचे ते लाड मी पुरवितो किंवा माझी सेवा करण्याची इच्छा असेल, तर त्यांच्या ठिकाणी प्रेमभाव उत्पन्न करतो. याप्रमाणे ते मनामध्ये जी जी इच्छा करितात, ती ती इच्छा मी पूर्ण करतो व त्यांना दिलेल्याचे रक्षणही मीच करतो. ज्यांच्या सर्व वृत्तीला मी आश्रय दिला आहे, अशा अनन्यभक्ताचा योगक्षेम मलाच चालवावा लागतो.

संतांसी जो अनन्यशरण। मीही वंदी तयाचे चरण।
ऐसे वदला उद्धवा आपण। संत महिमान श्रीकृष्ण ॥३२॥ श्री साईसत्‌चरित, अध्याय ११

श्रीकृष्ण उद्धवाला सांगतात की, संताला जो शरण गेलेला आहे, त्याचे चरण मी वंदितो. ईश्वराला आपलासा करण्यासाठी भक्ती इतके दुसरे कोणतेही साधन नाही. श्री साईबाबा म्हणतात, ''तुम्ही माझे स्मरण ठेवा; इतर सर्व गोष्टी विसरलात, तरी माझे विस्मरण होऊ देऊ नका.''

पूर्ण विरक्तीची विरक्ति। ऐसी साईंची सगुण मूर्ति।
अनन्यभक्तां निजविश्रांति। आठवूं चित्तीं संप्रेम ॥६॥
चरण धरिता अनन्यभावें। गुरुचि काय परब्रह्म हेलावें।
ऐसे गुरुपूजेचे नवलावें। अनुभवावें गुरुभक्तें ॥७॥

—श्री साईसत्‌चरित, अध्याय ११

श्री साईबाबा हे अवतारी महात्मा होते. त्यांचे दर्शन घेतले की, प्रत्येक साईभक्ताच्या मनात समाधान झाल्याशिवाय रहात नाही. श्री साईबाबांची भक्ती करताना त्यांचे अखंड नामस्मरण करावे लागते. ईश्वराच्या अस्तित्वाचे दर्शन घडविणाऱ्या व सामान्य बुद्धीच्या पलीकडे पोहोचलेल्या, साक्षात्कारी प्रतिभेचे ते गूढ, अगम्य, अनाकलनीय वृत्तीचे परोपकारी संत होते. बाबांनी भक्तांना भक्तिमार्ग हा ईश्वर प्राप्तीचा मार्ग आहे, अशी शिकवण दिली. परमेश्वराचे अस्तित्व सर्व चराचर सृष्टीत आहे. त्या परमेश्वरापुढे तुम्ही नतमस्तक व्हा. तुम्ही अनाथ व्हा. जीवनसूत्र त्या परमेश्वराकडे सोपवा. पूर्णपणे शरण जा.

श्री साईबाबा म्हणतात, "जर तुम्ही माझ्याकडे पहाल, तर मीही तुमच्याकडे पाहीन!"

बाबांच्या समाधीचे दर्शन घेता, बाबांची उदी प्राशन करता, बाबांचे नुसते नाव घेता साईभक्तांची कठीण कार्येही सुलभ होतात, दुःखे दूर होतात. बाबांचे नुसते श्रीमुख पाहून धन्यता वाटते, प्रत्येक माणसाला आनंद मिळतो, सुख-समाधान मिळते, आपल्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते.

श्री साईबाबांनी सांगितले आहे की, "मात्र माझे करा स्मरण। विश्वासयुक्त अंतःकरण। ठेवा करा निष्काम भजन। कृत कल्याण पावाल॥"

भक्तांनी माझे अनन्यश्रद्धायुक्त अंतःकरणाने नामस्मरण केले, भजन केले, तर भक्ताच्या जीवनाचे सार्थक होईल.

श्री साईबाबांचा प्रत्येक भूतमात्रामध्ये वास असतो, हे आपल्याला श्री साईसत्‌चरितातील खालील कथेवरून दिसून येईल. एकदा बाबासाहेब तर्खड यांची पत्नी शिरडीत असताना ही गोष्ट घडलेली आहे. भोजनालयात पाने वाढून जेवणाची तयारी झाली होती. इतक्यात दुपारच्यावेळी भुकेने व्याकुळ झालेला एक कुत्रा दरवाजात हजर झाला. त्याला त्या बाईंनं आपल्या पानावरील एक भाकरीचा तुकडा घातला. इतक्यात एक चिखलाने माखलेला डुक्कर भुकेने व तहानेने व्याकुळ होऊन तेथे आला. त्यालासुद्धा बाईंनी दुसरी शिल्लक राहिलेली भाकरी खाऊ घातली. नंतर शिल्लक राहिलेली भाकरी, अन्न बाई जेवल्या.

ह्या घटना त्या बाईच्या ध्यानी मनी नसताना घडल्या. दुपारी जेवण झाल्यानंतर तर्खडबाई नेहमीप्रमाणे मशिदीमध्ये बसल्या. त्या साईबाबांपासून दूर अंतरावर बसल्या. त्यावेळी बाबांनी त्या बाईला विचारले. "आई! तू मला आज यथेच्छ पोटभर जेवू घातलेस; माझे प्राण भुकेने व्याकुळ झालेले होते, तेव्हा तू मला अन्न देऊन तृप्त केलेस; जीवदान दिलेस. असेच नेहमी तू करीत जावेस. असेच नेहमी भुकेलेल्यांना अन्न-दान करावे. या मशिदीमध्ये बसून मी कधीही असत्य बोलणार नाही. आजच्याप्रमाणेच तू जेवण्यापूर्वी भुकेलेल्यांना अन्न-पाणी देऊन नंतर आपण अन्नग्रहण करावे. बाबासाहेबांच्या पत्नी म्हणाल्या, "बाबा! मी तुम्हाला जेवावयास वाढीनच्च कसे? मीच सध्या पराधीन असून मिळेल ते जेवण जेवते; मग, मला हे कसे शक्य आहे?

तेव्हा, श्री बाबा त्या बाईला म्हणाले, "आई! तू जेवावयास बसली असताना तुझ्या दारावर एक भुकेलेला कुत्रा व डुक्कर आला असता, त्या प्रत्येकाला भाकरी घालून त्यांचा आत्मा तू तृप्त केलास; तेव्हा, तू मलाच तृप्त केलेस, असे समज."

मी कधी मांजर, कधी कुत्रा, कधी गाय, तर कधी डुक्कर यांचे रूप घेऊन फिरत असतो. प्रत्येक प्राणीमात्रामध्ये मला पहात जा : त्याच्याशी भेदभाव करू नकोस, त्यांचा आत्मा तू संतुष्ट कर; म्हणजे मला ते पावन होईल.

श्री साईबाबांनी आपणांस खालीलप्रमाणे शिकवण दिली. आपल्या दरवाजावर कोणीही व्यक्ती अगर प्राणी आला, तरी त्याला झिडकारू नका. तहानेल्याला पाणी पाजा, भुकेल्या जीवाला अन्न द्या, गरीब, दीन-दुबळ्या लोकांना वस्त्र अर्पण करा. तसेच, अवेळी तुमच्या घरी अतिथी आला, तर त्याला आश्रय द्या. सर्व प्राणीमात्रांत देव आहे, ही भावना ठेवा. कुणाचेही मन दुखवू नका. जात-पात, सोवळे-ओवळे, धर्म-अधर्म यांवर फारसा विश्वास ठेवू नका. कोणताही संकल्प मनात धरू नका व निष्काम भक्ती करा. आपल्या हातून काही चूक अपराध झाला, तर श्री साईंना शरण जावे. 'तुम मेरा नाम लो, मै तुम्हारी याद करूंगा' हा नामस्मरणाचा सोपा मार्ग श्री साईबाबांनी सांगितला आहे. तो आपण आपल्या जीवनात आचरण करू या.

आराम: कल्पवृक्षाणां विराम: सकलापदाम्।
अभिराम: त्रिलोकानां राम: श्रीमान् स न: प्रभु: ।।

राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे
सहस्रनामत: तुल्यं राम नाम वरानने

(रामरक्षा)


# अद्वैत गुरु-शिष्य योग

- श्री. सतीश चुरी
विरार (पूर्व), ठाणे.

अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, शेगावचे श्री गजानन महाराज व शिरडीचे श्री साईबाबा यांच्यासारख्या साक्षात् परमेश्वरावतारांचा जन्म कधी झाला, त्यांचे मातापिता कोण, याबाबत केवळ गूढच आहे. शिवाय त्यांनी स्वत:चा नामोल्लेखही कधी केला नाही. अक्कलकोटनिवासी भगवंताला लोक 'स्वामी' म्हणू लागले, शेगावीचा महापुरुष नेहमी 'गण गण गणांत बोते'चा जप करतो, म्हणून त्याला 'गजानन महाराज' हे नामाभिधान प्राप्त झाले, तसेच शिरडीस आलेली षोडशवर्षीय बालमूर्ती पाहून हा कोणीतरी 'साई अवलिया' असावा, असे वाटून म्हाळसापतीने त्याला 'साईबाबा' म्हणून संबोधिले.

शिरडीच्या साईबाबांचा महिमा पुढे फार वाढत गेला व निर्वाणापूर्वीची १०-१२ वर्षे तर भक्तांचा खूपच राबता होता. बाबांचे भक्त अनेक होते; परंतु आतापावेतो शिष्य कोणीच नव्हता. तर, आषाढ शके १८३३ म्हणजे १९१२च्या सुमाराला सकाळी नऊ-दहा वाजता काशिनाथ गोविंद उपासनी नावाचा आचके देणारा व्याधिग्रस्त (जी की योगविद्येतील एक उच्चावस्था असते.) इसम द्वारकामाईत प्रवेश करता झाला. तदनंतर त्याच्यावर यथावकाश बाबांची कृपा होऊन त्याला अनुग्रहरूपाने पुढची चार वर्षे खंडोबा मंदिरात रहायला बाबांकडून सांगण्यात आले.

परंतु सुरुवातीच्या एक-दोन महिन्यांत कंटाळून जाऊन घरी जाण्याबाबतची शिफारस घेऊन ते साईबाबांकडे आले, तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "अरे, आता तू कुठंच जायाचं नाहीस. सगळी दुनिया एकीकडं व तू एकीकडं येवढी तुझी योग्यता हाय. चार वर्षं युगंमुगं या विठोबाच्या देवळात पडून रहात जा! कोणच्या भानगडीत पडून नये. तुझ्यासारखं कुणाचं नाही." यावर उपासनी म्हणाले, "बाबा, माझा कोणताच अधिकार नसता, मला घरी जायवाची परवानगी न देता व मला ज्यातले काहीएक कळत नसता, तुम्ही मला कशाला डांबून ठेवता?" तेव्हा साईबाबा म्हणाले, "अरे, तू कोणच्याच गोष्टीचा विचार करू नकोस. तुझा अधिकार मला माहीत आहे. तुला यातलं काही कळत नसेल, तर काहीबी करू नकोस. माझं अर्धं डोकं कापून मी तुला देईन. मी स्वत: बरोबर येऊन तुला तिकीट काढून देईन. माझ्या हाताने मी तुला गाडीत बसवून देईन आणि कुठं बी ती गाडी थांबू न देता एकदम थेट ठिकाणावर मला जिथं पोचवायचं असेल, तिथं पोचवीन."



यानंतरची चार वर्षे मात्र उपासनी महाराजांना सच्चिदानंदावस्था प्राप्त होण्यापूर्वीच्या भ्रमिष्टावस्थेत गेली आणि असेच ह्या मधल्या चार वर्षांच्या काळात काही दिवस गेल्यावर दिवाळीच्या सुमारास एक म्हातारा, गौरवर्ण असलेला, पांढराशुभ्र पोपाख केलेला ब्राह्मण गृहस्थ, वृद्धावस्थेला शोभेल अशी काठी हातात घेऊन व काखेत बरेच मोठे पुस्तकांचे गाठोडे घेऊन संध्याकाळी चारच्या सुमाराला खंडोबा मंदिराचा दरवाज़ा उघडून उपासनी महाराजांच्या दर्शनाला आला. देवळात येऊन आपल्याला कोणी त्रास देऊ नये म्हणून महाराज सर्वांना धाबरवीत असत; परंतु त्या वृद्ध ब्राह्मणाला पाहून त्याला सगावून काढून द्यावे, असे त्यांना वाटले नाही. त्यांनी सौम्य शब्दांत विचारले, "काय आजोबा, कोणीकडे आलात?". तो आत येऊन बसला व हसतमुखाने म्हणाला, "साईबाबांच्या दर्शनाला आलो होतो. आपल्यावर बाबांची कृपा आहे, असे ऐकले म्हणून आपल्याही दर्शनाला आलो."

तो ब्राह्मण गृहस्थ एक नावाजलेला सामुद्रिक होता. त्याने लहान-मोठ्या, रसेरज़वाड्यांची भविष्यं बघितली होती, त्यांची टीप्पणी केली होती; परंतु त्याला आजपर्यंत सत्पुरुष महात्म्ये, अवतारी पुरुषांची चिन्हे माहीत असूनही पहायला मिळाली नव्हती. असेच काही प्रसंगोपात बोलणे झाल्यावर तो म्हातारा ब्राह्मण उपासनी महाराजांना म्हणाला, "साईबाबांची ख्याती ऐकून मला अवतारी पुरुषांची चिन्हे पहावयास मिळतील म्हणून येथे आलो; परंतु साईबाबा मला काही पहावयास देतील, असे त्यांच्या स्वभावावरुन वाटत नाही. मी मशिदीत जाऊन बसलो व सहजतेने त्यांचे पाय पुढे होते, त्यांवरील रेषांवर नजर टाकतो न टाकतो, तोच मला त्यांनी धुडकावून लावले व मला अनुलक्षून कोण्या दुसऱ्या एकास ते म्हणाले, "हा म्हातारडा माझ्या घराचे वासे मोजायला आला आहे! माझा का ह्याला थांग लागणार आहे?" तरीपण आपल्यावर बाबांनी अनुग्रह केला आहे, म्हणून आपले सामुद्रिक पहायची इच्छा आहे." एवढे ऐकले मात्र नि उपासनी महाराज एकदम चिडले व शिव्यागाळ करून त्यांनी त्या ब्राह्मणाला हाकलून दिले. अनेकदा झिडकारूनही त्या म्हाताऱ्याने हट्टच धरला, तेव्हा नाखुशीनेच ते तयार झाले.

त्या सामुद्रिकाजवळ एक रेशमाची दोरी, एक मापाची पट्टी व एक सूक्ष्मदर्शक भिंग होतं. पहिल्याने त्याने रेशमाच्या दोरीने महाराजांची पायापासून डोक्यापर्यंत उंची मोजली, डोक्याचा आकार मोजला, तळपायाचे माप घेतले, डोक्याच्या व छातीच्या केसांची ठेवण पडताळली. काही ठिकाणी भिंग लावून निरीक्षण केलं; डोकं, मान, गळा, कान सर्व टीपून घेतलं व हे टीपता टीपता कधी त्याच्या चेहऱ्यावर प्रफुल्लता दिसून येई, तर कधी प्रेमाश्रूंचा पूर येई. हे असे पाहणे जवळ जवळ तीन चार दिवस

चालले. सत्पुरुषांच्या एका चिन्हात शेकडो चिन्हें दिसतात. एकाच चिन्हाला अमुक एक म्हटले, तर दुसरे चिन्हही तेथे दिसू लागते व आणखी निरखून पाहिल्यास तिसरे, चवथे, अशी अनेक चिन्हे दिसू लागतात. जसे सत्पुरुषांच्या भाषेत एकच शब्द; पण मोठा व्यापक असतो, जसजसा विचार करावा, तसतसे पुष्कळ अर्थ निघतात. त्या सामुद्रिकाला एकाच चिन्हात 'शेष' दिसला, नंतर 'ध्वज' दिसला व सरतेशेवटी अगदी निरखून पाहिल्यावर सर्वांत श्रेष्ठ चिन्हं 'मकर ध्वज' दिसला. मकरध्वजाचे हे चिन्ह परमेश्वरी अवतार असल्याशिवाय येतच नाही.. डाव्या हातावर 'अग्निकुंडा'चं चिन्हं होतं. मनुष्याचा व पशूचा आकार एक झालेलं चिन्हं होतं, जें केवळ अद्वैत अवस्था येणाऱ्यांच्याच हातावर असते. उजव्या हातावर एकावर एक असे दोन दहाचे आकडें होते, ज्याचा अर्थ असा होतो की, दहाही अवतार उपासनी महाराजांच्या शरीरात वास करून होते. उजव्या हातात अंगठ्याजवळ प्रदक्षणीय शेष होता. अंगठ्याच्या मागून येऊन तोंडात त्याचे शेपूट गेलेले होते. त्याचप्रमाणे त्याच्यांचजवळ दुसरी एक सर्पाकृती पहिलीच्या उलट तऱ्हेची होती. डाव्या हातावर एक पंचमुखी शेष होता. याखेरीज मच्छ, कच्छ, शंख, चक्र, गदा, पद्म, परशू, धनुष्य अशी नानातऱ्हेची. चिन्हं होती.

साईबाबांच्या हयातीत तिन्ही त्रिकाळ त्यांची आरती करण्याचा मान श्री. बापूसाहेब जोग यांच्याकडे होता. आरती सुरु करण्यापूर्वी जोग आपल्याकडील रूद्राक्षांची माळ बाबांच्या गळ्यात घालत व आरती संपल्यावर बाबांच्या हातावर एक चांदीचा रुपया व खडीसाखर ठेवत असत आणि मग रूद्राक्षांची माळ पुन्हां मागून घेत असत. हा नेम शेवटपर्यंत चालू होता. निर्वाणापूर्वी चार दिवस अगोदर बाबांनी जोगांना सांगितले, "अरे, बापू, ही माळ आता मला घालू नकोस. आता मी तुला त्याच्यातच (उपासनी महाराजांच्या शरीरात) भेटेन. त्या उपासनीला ही माळ नेऊन दे." असे बोलून जणूकाही बाबांनी गुरु-शिष्यामधले अद्वैत नाते दाखवून दिले व आपल्या निर्वाणाचेंही सूचन केले. नंतर ती माळ उपासनी महाराजांनी आपल्या स्वतःच्या निर्वाणसमयी आपल्या शिष्या म्हणजे आपल्या पूज्य गोदावरी माताजींना दिली.

ज्या अर्थी श्री साईबाबांनी, "मी तुला माझे अर्धे डोके (ज्ञान) कापून देतो," असे म्हटले, त्या अर्थी प्रत्यक्ष साईबाबा किती पूर्णावस्थेला पोहोचलेले सत्पुरुष असतील व त्याचप्रमाणे श्री गजानन महाराज, श्री स्वामी समर्थ, श्री नृसिंह सरस्वती, श्री माणिकप्रभू, श्री श्रीपादवल्लभ ह्या चढत्या श्रेणीच्या सत्पुरुषांच्या परमावस्थेबाबत विचार करणेंच कल्पनातीत आहे.

---

# श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र

(श्री साईलीला, शके १९६२ कार्तिक अंकावरुन)
(मागील अंकावरुन पुढे चालू)

## माधवराव बाबांना ज्ञान शिकवूं पहातात. बाबा त्यांची कान उघाडणी करून समजूत करतात.

अर्जुनाने एकदा दिसण्यात दिसणाऱ्या परमात्म्याच्या असंबद्ध बोलण्याबद्दल परमात्म्याला रागावून असाच दोष दिला व म्हटले की देवा, वैद्यच जर पथ्य करायला सांगून रोग्याचे औषधांत विष कालवू लागला, तर त्या रोग्याने कसे जगावे रे देवा ?

'वैद्य पथ्य करुनि जाये। मग जरी आपणचि विष सुये।।
तरी रोगिया कैसेनि जिये। सांगे मज' ।।८।।

श्री. ज्ञा. अ. ३

परमात्मा म्हणाले "अर्जुना, तू स्वत:ला शहाणा समजतोस पण अज्ञान सोडीत नाहीस. व तुला शिकवू म्हणावे तर तूच आम्हाला मोटमोठ्या नीतीच्या गोष्टी सांगतोस."

'तू जाणता तरी म्हणवीसी। परी नेणिवेते न सांडिसी।।
आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी। बहुसाल नीति' ।।९२।।

श्री. ज्ञा. अ. २

म्हणून अर्जुना, प्रथम मी सांगतो तसे कर (अभ्यास कर) व त्याप्रमाणे न झाले तर रागाव.

'हेंचि कयिसयावरी होवे। ऐसा जरी संदेहो वर्तताहे।।
तरी अभ्यासूनि आदि पाहे। मग नव्हे तरी कोपे।।८०।।

श्री. ज्ञा. अ. ८

एका औरंगाबादेस राहणारे श्रीमंताचे बाईस मूल नव्हते. म्हणून ती शिरडीस बाबांचे दर्शनास गेली. तिने आपला हेतु माधवरावांस सांगितला. माधवरावांनी तिला नारळ घेऊन येऊन श्री द्वारकामाईत बसावयास सांगितले. नंतर बाबा खुषीत आहेत अशी संधि पाहून माधवरावांनी नारळ बाबांचे हातात देऊन बाबांचे चरणावर मस्तक ठेवण्यास त्या बाईस खुणावले. त्या बाईने तसे केले. माधवराव म्हणाले, देवा, घाल हा नारळ तिच्या ओटयात, व तुला मुलगा होईल असा तिला दे आशीर्वाद. बाबा म्हणाले "आपण नाही बुवा घालीत तिच्या ओटयात नारळ. अशा नारळानं कुठं पोरं होतात का रे श्याम्या?" नंतर पुढे बरीच हुजत घालून बाबांकडून तो नारळ माधवरावांनी त्या बाईचे ओटयात घालून दिला व "अल्ला तेरकु लडका देयगा" असा आशीर्वादही तिला देवविला. माधवराव म्हणाले "देवा, वर्षाच्या आंत लडका होईल असं म्हण". बाबा म्हणाले "बरं श्याम्या, वर्षाच्या आंत होईल तिला लडका". माधवराव म्हणाले "बघ बरं का देवा, जर कां वर्षाच्या आत या बाईला मुलगा झाला नाही तर हाच नारळ तुझ्या टाळक्यांत हानीन बरं का देवा". बाबा हसून व शांतपणे म्हणाले "जाय जाय श्याम्या: होईल होईल जाय". त्या प्रमाणे त्या बाईला वर्षाचे आत मुलगा झाला व तिने तावडतोब शिरडीस येऊन त्यास बाबांचे पायावर घातले. माधवराव कितीही संतापले व रागावले किंवा उपहासाने अमर्यादेने, अनादराने दांडगेपणाने बोलले तरी बाबा कधी रागावत नसत पण शांतपणे त्यांची समजूत घालीत.

## माधवरावांची बाबांना थट्टेची व प्रेमाची धमकी

माधवरावांनी दुपारची बाबांची आरती झाली म्हणजे बाबांना रोज मोठ्याने म्हणावे (दरडाऊन), देवा ऊठ. देवा ऊठ. चल आपल्या जागेवर. बैस (भक्तांनी आणिलेले नैवेद्य एके ठिकाणी करून तो सर्वांना वाटून देण्याकरतां). त्या निवेदाचा कर काला. आन् दे समद्यांना वाटून. असे माधवरावांनी म्हटल्या बरोबर बाबा हूं की चूं न करता आपल्या नेहमीच्या जागेवरून उठून निंबराजवळ जाऊन बसत व माधवराव सांगतील तसे करीत. माधवरावांचे बोल बाबांना गोड लागत. माधवरावांचे बाबांना जणुं काय वेडच लागले होते. माधवरावांच्या वाचेचे सर्व लळे बाबा पुरवीत असत.

अर्जुन मुद्धा कित्येक वेळा परमात्म्याला असेच रागाने बोले पण परमात्मा जास्त काही न बोलता निमूटपणे शांत चित्ताने ते सर्व सहन करून त्याची समजूत करीत. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी श्री संजयमुखद्वारा या गोष्टीचे फारच सुंदर व सुरस वर्णन केले आहे.

# दिव्य जीवनाकडे - ११

सत्यसाईबाबा यांनी आपल्या प्रेमवाहिनी, ज्ञानवाहिनी, ध्यानवाहिनी, प्रशांतिवाहिनी इत्यादी पुस्तकांद्वारे साधकांना उपयुक्त असे मौलिक विचार मांडले आहेत. त्याचा परामर्श घेऊ.

**प्रेमवाहिनी :** साधकाला चारित्र्य, सद्‌गुण, प्राणभूत आहेत. कारण त्यांची बैठक शाश्वत आत्मतत्त्वाशी कायम जोडलेली असते. विचार व सवयी बदलून सद्‌वर्तन सद्‌गुण चारित्र्य निर्माण होऊ शकते. चांगले संस्कार जीवन, पुनर्जन्म यांची दिशा ठरवितात. प्रत्येक कर्म पुष्प भक्ती व ज्ञानाने सुगंधित करावयास हवे. खरी सत्ता व शक्ती यांचे केंद्र परमेश्वर आहे, हे जाणून आपला क्षुद्र अहंकार दवडावयाचा असतो. ईश्वरस्मरण, मृदुसत्यभाषण याद्वारे साधना पुढे जाते. बाह्यवेष व साधनें यात भक्ती नाही. **शुद्ध अंतराने भगवंताचे ध्यान करणे, ही भक्ती होय! परमेश्वराला पूर्ण समर्पण होणे, हा प्रपत्ति वा शरणागतीचा दुसरा मार्ग होय.** भावसमाधीत चित्त स्थिर होते, भाव शुद्ध होतो, विचार लय पावतात. ध्यानातील रुप अवतीर्ण होते. ही 'सालोक्य' मुक्ती. सर्वत्र ईश्वराचे वैभव पहाणे, ही 'सामीप्य' मुक्ती. ईश्वराशी एकरुपता साधणे, ही 'सारुप्य' मुक्ती व पूर्ण तादात्म्य ही 'सायुज्य' मुक्ती. या चारही मुक्ती प्रेमीभक्ताच्या स्वाधीन होतात.

**ज्ञानवाहिनी :** शुद्ध झालेल्या पंचकोशातून आत्मा वेगळा प्रकाशित पहाणे, हा साक्षात्कार वा ज्ञानाचा उदय होय. वैराग्य, मनोलय व तत्त्वचिंतन यांमुळे वस्तूंचा मोह दूर होतो व मूळ आनंदाकडे जीव वळतो. वासना व वृत्ती यांच्या लाटा याचा रुपात लय करावा लागतो, तेव्हा आत्मा प्रकाशतो. जीवन्मुक्त मनाच्या लाटा थांबवून "रुपलय" साधतो. अरूपलय म्हणजे सर्व वृत्ती अरूपात विसर्जित करणे, हे विदेह मुक्तीच्या वेळीच साधते.

**धर्मवाहिनी :** सद्‌गुणाचा उपयोग समाजाच्या उत्कर्षासाठीही होतो. गुणी संस्कारशील जीवन म्हणजे धर्मजीवन. धर्म म्हणजे अहंकाराचा बळी जीवनयज्ञात देणे. स्वार्थी वासना सोडणे, करुणामय होणे, मीपणाचा लोप करणे, शुभ कर्मांनी प्रभूची पूजा करणे. आत्मस्वरुपावर आधारलेली मानवजातीची एकता धर्म शिकवितो. यासाठी स्त्रिया व पुरुष हे सद्‌गुणसंपन्न व नीतिमान व सेवाव्रती असावयास हवेत.

**ध्यानवाहिनी :** ध्यानाची पायरी गाठण्यापूर्वी तीन पायऱ्या प्रथम ओलांडावयास हव्या (१) सत्कर्म, सद्गुण, चारित्र्य बाणविणे (२) प्रेम, भक्ती, समर्पण, शरणागती आचरणे (३) वृत्ती व संकल्प बंद करून सर्वत्र ब्रह्मभावाने पहाणे, या तीन पायऱ्या कर्म, भक्ती, ज्ञानाच्या आहेत. त्यानंतर ध्यान साधते. ध्यान, मन, बुद्धी या बैलांची गाडी आत्म्याच्या गावी ओढून नेते. मनोवृत्ति, विकार, प्रेरणा ध्यानाच्या भिंगाद्वारे एकाग्र करुन आत्म्याची ज्योत प्रज्वलित करता येते. यासाठी निष्ठा व सबुरी हवी. कोणत्याही कठीण परिस्थितीत फळाची अपेक्षा न करता सत्कार्य करणे, साधनेत रत रहाणे व सर्वांचे कल्याण चिंतणे, म्हणजे सबुरीचा मार्ग होय. वस्तूबद्दलची आतुरता ही इच्छा आहे. संकल्प हा परमेश्वरी शक्ती आहे. त्याद्वारे परमेश्वर जोडतो. नैतिक पातळीवरील निश्चय हाच संकल्प होय! श्रद्धा, आनंद, तितीक्षा यांतून संकल्प सतेज व ईश्वरी बनतो. निर्माणक्षम होतो. प्रेम व अनुसंधान यामुळे ध्यानातून रुपाची निर्मिती होते. त्यानंतर रुपाचा लय होऊन समाधी साधते.

**प्रशांतिवाहिनी :** प्रशांति म्हणजे ब्रह्मानंदाचा अखंड झरा. भौतिक आनंदाहून हा आगळा आहे. यातून प्रेम, धर्म, ज्ञान, सत्य सहज स्फुरते. प्रशांतीसाठी (१) सदाचरण (२) नियमबद्ध तप आचार (३) अविचल आसन (बैठक) (४) प्राणायाम (जगाचे भान आवरणे) (५) प्रत्याहार (चित्त अंतर्मुख वळविणे) (६) धारणा (परमेश्वराकडे भाव, विचार एक प्रवाहात वाहणे) (७) ध्यान (जाणीव ज्ञानात जिरविणे) (८) समाधी (त्रिपुटीचा नाश होऊन मनाचा लय होणे) एवढ्या गोष्टी साधाव्या लागतात. यामुळे साधक हा साक्षात्कारापर्यंत पोहोचतो व समाजाचा व धर्माचा एक उत्तम घटक होतो. या सर्व वाहिन्यांचा संकलित अभ्यास केल्यास चारित्र्य, भक्ती, ज्ञान, ध्यान व शांति या मार्गाने मानवीजीवनात वैयक्तिक व सामाजिक उद्धार साधायचा मार्ग हेच दिव्य जीवन असल्याचे प्रतीत होते. म्हणजेच मोक्षसाधनेची सत्कर्मे, समर्पण, सेवा, संयम, ध्यान ही अविभाज्य अंगे आहेत, हे स्पष्ट आहे.

**उपनिषद्वाहिनी :** 'कठोनिषद्' ॐकार साधनेने व इंद्रिय उपशमाने आत्मदर्शन व हिरण्यगर्भाची प्राप्ती होत असल्याचे शिकविते. निर्मळ हृदयात आत्मा प्रकाशतो. आत्मपुरुष भ्रमाने लपला आहे. साक्षात्काराने ब्रह्मलोकात जाऊन तो हिरण्यगर्भात लुप्त होतो व प्रलयकाळात हिरण्यगर्भासह मुक्त होतो. 'ईशावास्य' उपनिषदात निष्काम कर्म, त्यागपूर्वक भोग, संन्यासपूर्वक ज्ञाननिष्ठा शिकविली आहे. त्यामुळे चित्त शुद्ध होते. एकाग्रता साधते. 'मुंडक' उपनिषदात हृदयात जीवात्मा रहातो. ॐकारध्यानाने आत्मसाक्षात्कार होतो व परमात्मा ध्यानाने चित्ताची एकाग्रता होऊन हृदयातून प्रकाशतो, असे सांगितले आहे. 'मांडुक्य' उपनिषद् ॐकार हेच ब्रह्म मानले आहे. तुरीया अवस्थेत 'मी' शुद्ध होतो. चित्त हे संसार निर्माण करते. मनोव्यापार नष्ट झाल्यावर

तुरिया लाभते व आत्मदर्शन होते. 'प्रश्नोपनिषदा'त हृदयाकाशात रहाणारा केवळ पुरुष सोळा कलांत विराजतो, असे म्हटले आहे. 'केनोपनिषदात' मन व वृत्ती चालविणारा शक्ती ईश्वर आहे. आत्मतेज इंद्रियांना चालना देते, असे वर्णन आहे. 'छांदोग्य' उपनिषद् चित्तशुद्धी व चित्तएकाग्रतेचे महत्त्व सांगते. परमात्मतत्त्वावर वृत्ती स्थिर करणे, हे ध्यान होय! इंद्रिये मनात लीन करून हृदयाकाशात रहावे. सुषुम्नेद्वारे सूर्योपासनेने सूर्यलोकात ज्ञानी जातो. हृदयाकाश ज्योत हेच परब्रह्म होय. 'बृहदारण्य' उपनिषद हे ब्रह्मज्ञानासाठी आवश्यक कर्मोपासना सांगते; तर 'ऐतदेयोपनिषद्' नेत्र कंठ व हृदय ही आत्म्याची क्रीडास्थाने असल्याचे सांगते. ''ब्रह्मानुभव उपनिषद्'' हृदयगुहेतील 'मी' हाच ब्रह्म असल्याचे शिकविते. मनोनाश व त्रिपुटीनाश यामुळे ब्रह्माची प्राप्ती होते, ही याची शिकवण आहे.

# श्री साई महिमा

गोदावरी काठी ग
आहे शिरडी धाम
त्या मध्ये वसे नित्य
माझा देव साईराम ॥१॥

साईसी जो शरण गेला
साई त्याला म्हणे आपुला
'श्रद्धा' आणि 'सबुरी'चा ग
मंत्र कानी ग फुंकिला ॥२॥

साईनामात भरली
आहे गोडीही अवीट
मरणाच्या फेऱ्यातुन
करी भक्तालागी मुक्त ॥३॥

ऐशा माझ्या साईजीच्या
लीला आहेत अपार
वर्णु जाता साईगीता
शब्द होती साईमय ॥४॥

- कु. सुरेखा धों. होबळे
मयें, गोवा.

# कोण हा टॅक्सी-ड्रायव्हर ?

- श्री. शं. ग. सारंगधर
कांदिवली (प.), मुंबई.

श्री साईबाबा हयात असताना अनेक भक्तांना अनेकदा विस्मयकारक अनुभव येऊन अडचणींतून मार्ग सापडे. अकल्पितपणे संकट टळल्याचा दिलासा मिळे. श्री बाबांच्या निर्वाणानंतरसुद्धा भक्तांना येणाऱ्या विविध अनुभवांचं प्रतिबिंब 'श्री साईलीला'च्या यावेळच्या दिवाळी-अंकात (नोव्हेंबर-डिसेंबर १९८९च्या भक्तस्वानुभव विशेषांकात) आपल्याला वाचायला मिळते.

श्री. नानासाहेब चांदोरकर हे एक श्री बाबांचे श्रेष्ठ भक्त. श्री बाबांच्या आणि नानांच्या नेहमी गप्पा-गोष्टी, चर्चा चालायच्या. श्री. नानासाहेब जामनेरला एक वरिष्ठ सरकारी अधिकारी असताना, त्यांना आलेला, श्री बाबांचा भक्तांच्या संकट निवारणासाठी धावून येणाऱ्या प्रसंगाचे वर्णन करणारा अनुभव श्रीसाईसत्चरितकार श्री. अण्णासाहेब दाभोलकर यांनी ३३व्या अध्यायात कथन केला आहे. श्री. ग. गो. टाकळे, मुंबई यांनी 'टॅक्सी ड्रायव्हरच्या रुपात बाबा' या दिवाळी अंकातील (नोव्हेंबर-डिसेंबर १९८९) लेखात असाच आपला अनुभव सांगितला आहे. या दोन अनुभवांत आपल्याला विलक्षण साम्य आढळून येते. यासाठी श्री. दाभोलकरांच्या कथेतील प्रसंग आधी सांगतो ; म्हणजे दिवाळी अंकातील वरील भक्ताच्या अनुभवातील साम्य वाचकांच्या लक्षात येईल.

कुणाही भक्तावर कुठेही, कसलेही संकट आले की, द्वारकामाईत श्री बाबा अस्वस्थ होत.

'घार हिंडे आकाशी।
लक्ष तिचे पिल्लापाशी।' अशी ती अवस्था असे.

भक्त काशिराम शिंप्यावर दरोडेखोरांनी हल्ला केला, तेव्हा द्वारकामाईत श्री बाबांनी सटक्याने खांबावर प्रहार करायला सुरुवात केली. तिकडे लोहाराची पोर भट्टीत पडणार म्हणून तिला वाचविण्यासाठी इकडे श्री बाबांनी धुनीत हात घातला. तसाच हा प्रकार—

नानासाहेबांची मुलगी बाळंतपणासाठी जामनेरला माहेरी आली होती. प्रसुतिसमयी निर्माण झालेल्या अडचणीमुळे घरातील सर्व मंडळी अस्वस्थ होती. मनोमनी श्री बाबांचा धावा चालू होता. इकडे द्वारकामाईत श्री बाबाही अस्वस्थ होते.

तोच, शिरडीतल्या प्रथेप्रमाणे खानदेशातील आपल्या गावी जायला निघालेले गोसावी रामगीरबुवा श्री बाबांची आज्ञा मागायला द्वारकामाईत आले. तेथे असलेल्या शामरावांना श्री बाबांनी एका पुडीत उदी व एका कागदावर 'आरती साईबाबा' ही श्री. अडकरांची आरती लिहून नानांना देण्यासाठी बुवांकडे द्यायला सांगितले. फक्त रेल्वे हंशीलापुरतेच पैसे खिशात असलेल्या बुवांच्या चेहऱ्यावरील चिंता ओळखून श्री बाबांनी त्यांना "तू निघ. काळजी करू नकोस. सर्व ठीक होईल" म्हणून निरोप दिला.

—बाबा वदती "तू स्वस्थ जाई।
लागेल तुझी सर्व सोयी"।
विश्वास ठेवूनि साईंचे पायी।
निघाले गोसावी जावया॥८४॥

श्री साईसत्‌चरित, अध्याय ३३

त्यावेळी जामनेरला जायला रेल्वेमार्ग नव्हता. पहाटे बुवा जळगाव स्टेशनवर उतरले. इतक्यात बुवांची चौकशी करीत एक टांगेवाला आला आणि "चला, नानांनी मला तुम्हाला घेऊन यायला सांगितलय" म्हणून बुवांना आपल्याबरोबर घेऊन निघाला. वाटेत एका ओढ्याकाठी टांगा थांबवून आपल्याजवळची शिदोरी त्याने सोडली. "चला, फराळ करू या" म्हणाला. मुसलमानाजवळचा फराळ आपण कसा खाणार? बुवा "मला भूक नाही" म्हणू लागले. बुवांच्या मनातली शंका जाणून टांगेवाला म्हणाला, "अरे, डरो मत, मैं मुसलमान नही हूं. मै हूं गढ़वाली रजपूत हिंदू आणि हा फराळपण नानांनीच दिलेला आहे; कारण जामनेर इथून बरंच दूर आहे." एवढे सांगून टांगेवाल्याने बुवांना फराळ खाऊ घातला.

दहाच्या सुमाराला टांगेवाला बुवांना नानांच्या ऑफिसजवळ घेऊन आला. "तुम्ही आत जाऊन नानांना भेटा, मी इथेच टांग्यात थांबतो" म्हणाला. बुवांनी आत जाऊन श्री बाबांनी दिलेली उदीची पुडी आणि आरतीचा कागद नानांना दिला. "आपण टांगा पाठविलात म्हणून बरं झालं. त्यामुळे येताना कसलाच त्रास झाला नाही."

नाना बुवांकडे आश्चर्याने पाहात म्हणाले, "मी टांगा पाठविला? अहो, तुम्ही येणार याची मला कल्पना तरी होती का? मग मी टांगा कसा पाठवीन." कोण टांगेवाला, हे पाहाण्यासाठी दोघेही बाहेर आले; पण बाहेर टांगाही नव्हता आणि टांगेवालाही नव्हता. श्री बाबांच्या या लीलेने दोघेही दिङ्मूढ झाले. तिथूनच त्यांनी श्री बाबांना नमस्कार केला.

आता, श्री बाबांच्या दर्शनासाठी मुंबईहून सहकुटुंब निघालेल्या श्री. टाकळे यांचा श्री साईलीलाच्या दिवाळी अंकातील हा अनुभव वाचा. चहा घेण्यासाठी खाली उतरल्यावर त्यांच्या सामानासह एस्.टी. पुढे निघून गेल्यामुळे ते काळजीत होते. आता बाबांच्या चरणांजवळ पोहचणार कसे? आणि रिक्त हस्ताने श्री बाबांच्या दर्शनाला कसे जायचे? पण शहापूरला भेटलेला टॅक्सीड्रायव्हर त्यांना नाशिकपर्यंत घेऊन जातो. मधल्या प्रवासात टांगेवाल्याप्रमाणेच त्यांना नाश्ता चहापाणी देतो; पण नंतर पैसे न घेताच जामनेरच्या टांगेवाल्याप्रमाणे गुप्त होतो.

ह्या दोन्ही प्रसंगातील साम्य श्री बाबांवर श्रद्धा ठेवणाऱ्या भक्तांना अडचणींतून बाहेर काढण्यासाठी आजही श्री बाबा धावून येतात, याची प्रचिती देते.

# साई आले

भगवी छाटी हाती वाटी
वाढ भिक्षा म्हणती माई
मूठ भिक्षा घेऊनी आले
पुष्प गंध दरवळे ॥१॥
आशीर्वाद देता बोले
श्रद्धा सबुरी मार्गे चाले
अल्ला करील चांगले
क्षणार्धात लुप्त झाले ॥२॥

- सौ. प्रतिभा द. पाडगावकर
दादर (प.), मुंबई.

# संन्यास

ऐहिक जीवनाचा त्याग करून जे वैरागी जीवन जगतात, त्यांना आपल्याकडे ''संन्यासी'' म्हणून संबोधलं जातं. मोह, माया, द्वेष इत्यादींचा सर्वसंग परित्याग करून हे संन्यासी विरक्तीचं जीवन जगत असतात. काहीच करता आलं नाही म्हणून किंवा जीवनात अशी एखादी विपरित घटना घडते की, त्या प्रसंगामुळे काही व्यक्ती संन्यासी जीवन लादून घेतात; परंतु त्या व्यक्ती समाजाने आपल्यावर अन्याय केला आहे, अशी समजूत करुन घेऊन त्याच्याशी आपलं काही सोयरसुतक नाही, असं एकाकी जीवन जगत असतात. जाणीवपूर्वक, पूर्ण विचारांती जे संन्यास घेतात, ते दुनियेचा संसार करतात. ते शरीराने, मनाने दुर्बल नसतात, तर कोणत्याही कठीण प्रसंगाला सामोरे जाण्याचं सामर्थ्य त्यांच्यात असतं. माया त्यांना विरघळवू शकत नाही, दुःख त्यांना व्यथित करू शकत नाही, सुख त्यांना भारावू शकत नाही, स्वार्थ त्यांना मोहवू शकत नाही, वासना त्यांना स्पर्श करू शकत नाही. मानसन्मान, सत्ता, पैसा यांपासून ते परावृत्त असतात. त्यागमय जीवन त्यांनी जाणूनबुजून अंगिकारलेलं असतं. जीवनभर अशाप्रकारचं दृढ निश्चयी जीवन जगायला त्यांना सहाय्यभुत ठरतं, ते त्यांचं आध्यात्मिक, साधनामय जीवन. विश्वातली दुःखं, संघर्ष संपविण्यासाठी ते शाश्वत सत्याचा शोध घेत असतात. त्यांना कुठलाही धर्म किंवा जात बंदिस्त करु शकत नाही; एवढेच नव्हे, तर त्यांनी स्वतःचा परिचयही पुसून टाकलेला असतो. ते स्वतंत्रपणे विचार करतात. ते विचार त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचे असतात. महान मूल्यांचा ते पुरस्कार करतात आणि स्वतःसाठी नव्हे, समाजाच्या हितासाठी त्यांचा कसा उपयोग करता येईल, यावर चिंतन करतात. समाजाचे कल्याण साधत साधत आत्म्याची मुक्ती साधणं, हे संन्याशाचं अंतिम ध्येय असतं.

# ''ध्यास''

- श्री. चंद्रशेखर नकाते
सातारा.

माणसाला आयुष्यात चांगल्या गोष्टींचाच ध्यास लागायला हवा. एकदा का त्या गोष्टीचा ध्यास लागला, की मग आपण आपण रहात नाही. ज्या गोष्टीचा आपल्याला ध्यास लागलेला असतो, त्यात आपण विलीन होऊन जातो. पर्वत नदीला जन्म देतो; पण जन्मताच नदीला सागराचा ध्यास लागलेला असतो. जन्म घेताच ती सागराकडे धावत निघते. आपल्या जन्मदात्याकडे मग ती वळूनही पाहत नाही. थोडक्यात, माया तिला शिवत नाही. याचाच अर्थ, ध्यास लागला, की केवळ त्याच दिशेने वाटचाल सुरु होते.

असाच ध्यास जर साईंचा आपल्याला लागला, तर तो मानव केवळ नशीबवानच नाही, तर भाग्यवानच समजायचा. जर खरोखरच मनुष्याला अशा गोष्टीचा ध्यास लागला, तर तो साईरूप होईल, यात मुळी शंकाच नाही.

साईबाबांच्या नामस्मरणामधली गोडी अनुभवण्यासाठी नामस्मरणाची ओढ लागायला हवी. एकदा का ही ओढ आपल्या मनाला लागली व साईंचा ध्यास लागला, की जगातील दुःखे आपल्याला शीतल वाटतील, संकटे भीतीदायक वाटणार नाहीत व कोणत्याही गोष्टीचा आपल्याला लोभ राहणार नाही.

वास्तविक, ज्यावेळी साईभक्त साईबाबांची भक्ती करीत असतो, त्यावेळी तो कोणतीतरी अपेक्षा मनात बाळगीत असतो. सगळेच साईभक्त असे असतील, असे नाही; पण खरोखरीच जर साईंकडे आपण अंर्तमनाने पाहिले, तर ते स्वतः फाटकी पायघोळ कफनी घालून भक्ताला रेशमी कपड्यात असलेला पाहतात, त्याला वस्त्राची कमतरता भासू देत नाहीत.

स्वतः साई भिक्षा मागत; पण आपल्या भक्तांना मात्र अन्न-वस्त्राची ते कमतरता भासू देत नसत.

साईंच्या फाटक्या कफनीकडे पाहूनच भक्तांनी हा बोध घेतला पाहिजे की, **'फकिरी ही अव्वल बादशाही असते व अमिरी ही क्षणभंगुर'** असते. साईबाबांची तत्त्वे आचरणात आणली, तर जगात दुःख राहणारच नाही; किंबहुना, दुःख म्हणजे काय, असा प्रश्न पडेल.

साईंचा ध्यास अहोरात्र लागला, म्हणजे आपोआपच आपण साईज्योतीत विलीन होऊन जातो.

साईनाम श्वासात गोवले जाणे, हाच खरा भक्तीचा अनमोल मार्ग आहे, हाच साईंचा ध्यास आहे आणि याच ध्यासाची खरी जरूरी साईभक्तीला आहे. अप्रत्यक्षपणे साईभक्ती ही या ध्यासातून होत असते.

## तेजोनिधे साईस-

हे साईनिधे, हे दयानिधे
विश्वाच्या पसाऱ्यांत, प्रकाश किरणांत
भक्तिच्या रसांत तुझे बिंब।.
जीवनाच्या कोड्यांत, मनाच्या भोवऱ्यांत
भावनेच्या शिंपल्यांत प्रतिबिंब।
तुझ्याच मुर्तीत, तुझ्याच गीतांत
तुझ्याच लोचनी, काव्यबिंब
जीवनाच्या संगितात, तालाच्या सुरांत
कृपेच्या सागरांत, प्रतिबिंब

-सौ. मृ. ह. पुंडलिक
कल्याण, ठाणे.

साईभगिनींसाठी

# भाग्यवान् साईभगिनींनो !

प्रिय साईभगिनींनो, ''श्री साईलीले''त आम्ही भगिनींसाठी एक सदर चालू करू इच्छितो व आपल्यासर्वांकडे त्यासाठी चांगले उद्‍बोधक साहित्य पाठविण्याची विनंति करीत आहोत. आपले साईबंधु श्री. अनिल रसाळ हे पुढील महिन्यामध्ये प्रथम आपल्या विचारांची ओंजळ पहातील व या सदरांचा शुभारंभ करतील.

साईभगिनींनो, तुम्ही भाग्यवान आहात, कारण तुम्ही आम्हा साईबंधूंहूनही भगवंताच्या अगदी जवळ आहात. मी तुमची व्याजस्तुति करतो आहे, असे मात्र समजू नका. हे सत्यच मी सांगत आहे. कारण स्त्रियांचे हृदय फार कोमल, निष्पाप, भावनाविवश व प्रेमळ असते. स्त्रीवर्गाच्या मध्ये वक्रता व दंभाचे प्रमाण फारच अल्प असते. याचे कारण संसारातील व धावत्या गतिमान जीवनातील संघर्ष, समस्या व झगडे यांपासून त्या बऱ्याच दूर असतात. त्या धावत्या जीवनातील धुळीपासून व धगीपासून अलिप्त राहिल्याने त्यांच्या मनाची नैसर्गिक शुद्धता, सौम्यपणा व निरागसता मलीन होऊ शकत नाही. ईश्वराला तर स्वच्छ, शुद्ध, भावार्त मन फारच प्रिय असते. अशा मनातील भक्तीचा उत्फुल्ल फुलोरा स्त्रीवर्गच पुरुषवर्गाहून अधिक मोठ्या प्रमाणात प्रभूचरणी वाहू शकतो. यामुळेच भागवतात गोपींची भक्ती ही फार आदर्श मानली गेली व उद्धवासारख्या भक्तश्रेष्ठालाही तिचा उदात्त आदर्श प्रमाण मानावा लागला. आध्यात्मिक साधना व संस्था यांच्या अभ्युदयासाठी स्त्रियांची सेवावृत्ती, समर्पणभाव, स्वार्थत्याग, कर्तबगारी व संघटन शक्ती यांचा फार मोठा हातभार जगात लागलेला आहे. स्त्रीशक्तीमुळे या संस्थांच्या जीवनात फार मोठी शक्ती निर्माण झालेली जगाच्या इतिहासात दृष्टीस पडते.

वैधव्य प्राप्त झाल्यानंतर शिरडीस स्थायिक झालेल्या राधाकृष्णामाई यांचे उदाहरण येथे द्यावेसे वाटते. त्यांच्या सेवाभावाने व संघटनकौशल्याने शिरडीची भक्तिवेल पल्लवित, पुष्पित व फलित झाली व शिरडीचे संस्थान बनले. स्त्रियांची कार्यक्षमता, शक्ती व सामर्थ्य यांचे हे एक बोलके उदाहरण आहे.

भगिनींनो, आज तुम्हाला एक भक्तीचे गुह्य सांगून ही प्रस्तावना संपवितो :—

''भक्ती म्हणजे फुले वहाणे, नवस करणे, व्रत-वैकल्ये आचरणे नव्हे. भक्ती

म्हणजे मनाच्या वहाण्याची दिशा सतत साईरूपभगवंताकडे लावणे, प्रत्येक व्यक्तीमध्ये, प्राण्यामध्ये, पशूपक्षांमध्ये, वृक्षवल्लरींमध्ये भगवंताला पहाणे, प्रत्येक कृती भावना वा विचार भगवंताच्या पदावर वहाणे, ईश्वराची इच्छा समजून सुख-दु:खाचा श्रद्धा व सबुरीने स्वीकार करणे, सर्व प्रतिकूल वा अनुकूल परिस्थितीत सद्वर्तन व सेवाभाव कायम ठेवणे. साई हळव्या हृदयात रहातात. हृदय द्रवले पाहिजे. अशी माणसे साईंना आवडतात. गरूडाच्या चोचीत भक्ष्य जोवर असते, तोवर इतर पक्षी त्याला सतावीत रहातात. ते टाकले किंवा गिळले की मग हा त्रास थांबतो. तसेच दु:खाचे असते. संसारातील लोभ, आसक्ती, मद, मत्सर हे भक्ष आपण आपल्या चोचीतून टाकले पाहिजे. म्हणजे निरामय आनंद लाभतो. संसारातील त्रिताप मनाला छळीत नाहीत.''

या प्रत्येक शब्दावर वाक्यावर भगिनींनो, तुम्ही शांत मनाने चिंतन करा व एक सुंदरसा परिच्छेद 'साई भगिनींसाठी' ह्या सदराकरिता लिहून पाठवा. आम्ही तो योग्य वाटल्यास या सदरात अवश्य आपल्या नावे प्रसिद्ध करु.

- चकोर आजगांवकर

कुणि राम म्हणावे अथवा रहिम म्हणावे
परि अभेदरुपे नित त्याने विलसावे
वसतो न मंदिरी ना वसतो मशिदीत
प्रभु अखंड खेळे भक्तांच्या हृदयात


(श्री साईगीतायन)

# आळंदीचे 'संत-वस्तु-धाम'

जनतेच्या कल्याणासाठी सदासर्वदा झटणे, हेच सर्व संतांचे ब्रीद असते. सर्वसामान्यांच्या प्रवृत्ती, सभोवतालची परिस्थिती यांची यथार्थ जाण असल्याने सर्वसामान्यांनी अंधश्रद्धेस बळी न पडता, डोळसपणे योग्य त्या प्रयत्नांची कास धरून आपले जीवन सुखी करावे म्हणून युक्ती-प्रयुक्तीने संत मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्या या लोककल्याणकारी कामगिरीमुळेच ते वंदनीय ठरतात. तसेच, त्यांचे वाङ्मय, चरित्र व समाधिस्थान यातूनही जनतेला दिव्यतेचा संदेश मिळत असतो. इतकेच नव्हे, तर त्यांनी आपल्या हयातीत वापरलेल्या वस्तूंचे जरी दर्शन घडले, तरीही त्यांच्या पवित्र जीवनाचा आदर्श सहजतेने दृष्टीसमोर येऊन आपणासही आपले जीवन समृद्ध करण्याचा बोध नकळत मिळत असतो. परंतु असे संत व त्यांच्या दर्शनी वस्तू आढळणे तसे दुर्लभच असते. या दृष्टीने श्री क्षेत्र आळंदी येथे साकारलेल्या 'संत-वस्तु-धाम'चे मोल खरोखरच अनमोल ठरेल.

पुण्याचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डी. डी. रेगे यांचे व्यक्तिमत्त्व तसे विविध सद्गुणांनी नटलेले आहे. त्यांनी तैलरंगात चितारलेल्या व्यक्तिचित्रांमुळे ते प्रसिद्ध चित्रकार म्हणून नावाजलेले असले, तरीही त्यांचे लेख वा पुस्तके वाचली, त्यांचे विचार ऐकले, त्यांनी संग्रहीत केलेल्या वस्तू पाहिल्या, म्हणजे त्यांच्यातील लेखन कौशल्य, संशोधकता, संग्राहकता यांसारख्या विविध पैलूंचा परिचय घडतो. या दृष्टीने त्यांनी संशोधन करुन लिहिलेले श्री जंगलीमहाराज (पुणे) यांचे चरित्र वाचनीय ठरेल. नुकतेच त्यांनी आळंदीत स्वकष्टार्जित धनाने उभारलेल्या 'संत-वस्तु-धाम'चे उद्घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश मा. श्री. यशवंतराव चंद्रचुड यांच्या हस्ते संपन्न झाले असून भाविकांना दर्शनासाठी ते खुले करण्यात आले आहे.

या 'संत-वस्तु-धाम'मध्ये श्री. रेगे यांनी गेल्या वीस-पंचवीस वर्षांत मोठ्या मेहनतीने मिळविलेल्या विविध पंथ, संप्रदायांच्या सुमारे ६५ संतांनी वापरलेल्या परमपवित्र वस्तूंचा संग्रह एकत्रित केला आहे. त्या २००शे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या संतांपासून ते आजमितीस विद्यमान असलेल्या विविध संतांच्या वस्तूंचा समावेश आहे. हे साकार करताना त्यांना अतोनात शारीरिक-मानसिक कष्ट पडलेच, पण कोणाकडूनही काहीही न घेता केवळ स्वकष्टाच्या धनानेच हे साकार करण्याच्या त्यांच्या निरपेक्ष वृत्तीने त्यांनी आपल्या जवळील वर्षानुवर्षे जतन करून ठेवलेल्या थोर चित्रकारांच्या मूळ दुर्मिळ कलाकृती, तसेच स्वतः काढलेल्या विविध तैलचित्रांना प्रसंगोपात राष्ट्रपती, पंतप्रधान व इतर जागतिक नेते यांच्या हस्ते बक्षिस मिळालेली सोन्याचांदीची पदके



व भेट-वस्तू इत्यादी गोष्टी विकून त्यांनी हे अभिनव संत-मंदिर उभारलेले आहे. आपल्या मातोश्रींकडूनच हा सद्‌विचारांचा वारसा मिळाल्यामुळे मातोश्रींचा अर्धपुतळा बसवून व सभागृहास कै. लक्ष्मीबाई रेगे सभागृह असे नामकरण करून श्री. रेगेंनी मातृप्रेमाचा आदर्शही जनतेपुढे ठेवला आहे.

संतांच्या वस्तू मिळविणे, ही अवघड गोष्ट असली, तरीही वेगवेगळ्या अडचणींना तोंड देऊन, अनेक भलेबुरे अनुभव घेऊन श्री. रेगेंनी त्या कशा मिळविल्या, त्याचे वास्तव, तितकेच रसाळ शब्दांत वर्णन केलेले 'संत प्रसाद' हे पुस्तकही त्यांनी लिहून प्रकाशित केलेले आहे. ते वाचल्यावर त्यांचे करावे तितके कौतुक थोडेच वाटते.

ह्या संत-धामामध्ये परमपूज्य माणिक प्रभू, स्वामी समर्थ, श्री गोंदवलेकर, श्री पंत बाळे कुंद्रीकर, श्री साईबाबा, ताजुद्दीन अवलीया, साधु वास्वानी इत्यादी संतांनी वापरलेल्या-चर्म-पादुका (शाल, टोपी) वगैरे वस्त्रे, मृगाजीन, जपमाळा यांसारख्या दर्शनी वस्तू पाहावयास मिळतात. श्री साईभक्तांच्या दृष्टीने आनंदाची गोष्ट म्हणजे, श्री सद्‌गुरु साईबाबा यांचे हस्तस्पर्श झालेले नाणे, श्रीचरणचिन्हांकित मुद्रा व बाबांनी वापरलेल्या वस्त्राचा भाग यांसारख्या परमपवित्र वस्तूंचे दर्शन येथे घडते. त्यातच कोल्हापूरातील श्री. बालमुकुंद बालावधूत, श्री. भैरु पाटील, श्री. चिले महाराज, श्री. शंकरबाबा (लुगडी ओळ), श्री. दत्ताबाळ, यांच्याबरोबर सांगलीचे श्री. मामा केळकर, श्री. वजीर बाबा (औरवाड) या संतांच्या वस्तूंचे दर्शनही भाविकांना घडते. परंतु यात कुंभारगल्लीचे श्री. कृष्ण सरस्वती दत्तमहाराज यांच्या वापरातील एकही वस्तू नसावी, याची श्री. रेगेंना सतत खंत वाटते. त्यांच्या भक्तांनी याबाबत सहकार्य करावे, अशी त्यांची मनोमन अपेक्षा आहे.

प्रत्येक संताचे प्रत्यक्ष छायाचित्र व जवळच त्यांनी वापरलेल्या वस्तू मोठमोठ्या काचपेटीत सुबकतेने येथे मांडलेल्या आढळतात. हे सर्व पाहून कोणाही भाविकाचे मन आनंदाने भरून जाणे स्वाभाविकच आहे. म्हणूनच आळंदीत श्री ज्ञानदेवांच्या दर्शनानंतर जकातनाक्याशेजारील हे 'संत-वस्तु-धाम' पाहणे अगत्याचे ठरेल.

**- श्री. संजय श्री. वाघ**
मंगळवार पेठ, कोल्हापूर.

बालसाईभक्तांसाठी

- वैखरीताई


# रामनामाचे लाघव

बालसाईभक्तांनो, आज रामनवमी विशेषांकाच्या निमित्ताने मी रामनामाच्या जादूबद्दल बोलायचे ठरविले आहे. रामाचे नाव शक्ती व सामर्थ्यशाली असून त्यात दिव्य अर्थ भरला आहे, असे मानले जाते. श्री दत्तात्रेय व शिव ही दैवतेही रामाचे नाव घेतात खरेच असे काय या नामात भरले आहे? शिवाने समुद्रमंथनातून बाहेर पडलेले महाविष हालाहल प्राशन केले, त्यावेळी रामनामाचे अमृत शिवाला उतारा म्हणून घ्यावे लागले. तेव्हाच हलाहलाची प्रचंड उष्णता, दाह व विखार शांत झाला. रामनामाच्या उच्चाराने वाल्मीकि हे मुनि व द्रष्टे कवि झाले. त्याच्या सर्व पूर्वकर्मांचा व पापांचा निरास झाला. रामनामाने लंकेच्या समुद्रातील शिळाही तरल्या.

या साऱ्या दंतकथा म्हणून सोडून देऊं व रामनामाच्या रहस्याच्या सत्याला सरळ सामोरे जाऊ. रामनामात नादमय सुंदर 'रं'कार आहे. यात 'रं' बीज आहे, ते सौंदर्य, शक्ती यांचे कारक आहे. त्रिपुरसुंदरी श्री रमेच्या सामर्थ्याचे ते वाचक आहे. त्यामुळे त्याच्या केवळ उच्चाराने शांती, शक्ती व सत्य यांच्या स्पंदनांचा प्रत्यय येतो. रामनाम उच्चारले असता त्यातील रंकाराचा नाद नाडीचक्रातून ब्रह्मरंध्रापर्यंत चढत जातो. नाभीजवळील मणिपूरचक्रावरून हा नाद हृदयचक्रातील प्रेम व भक्तिभाव यातून वर उंचावत सहस्रारचक्रापर्यंत जातो. वाटेत कंठचक्रातील शब्द, स्पंद व तालुचक्रातील पंचतन्मात्रा यांचा गंध मिसळत जातो व हे सर्व चित्ताकाश, चिदाकाश व महदाकाश असा उच्च स्तरावर प्रवास करते. मन हे नादात लुप्त होते, प्राण हा आकाशात लीन होतो व जाणीव ही विश्वात्मक जाणीवेत मिसळत जाते. यामुळे मानव हा देव होतो, जीव हा शिव बनतो व आत्मा हा परमात्म्यात विलीन होतो.

बालसाईभक्तांनो, ही एक मानसिक व आत्मिक विकासाची प्रक्रिया आहे. त्यामुळे बालमनालाही कदाचित गूढ वाटेल. पण एवढी खात्री अवश्य बाळगा की रामनामस्मरणाने तुम्ही उंच पातळीवर चढता, जीवनाच्या उच्च स्तरावरून जगता, शारीरिक व मानसिक प्रगतीचा मोठा टप्पा गांठता. यासाठी साईरामाला वंदन करा. या रामनवमीच्या शुभावसरी रामरूप व रामनाम यात मिळून मिसळून जा. तुमचे कल्याण होईल.

# ऐसा हा अवतार विलक्षण



बालसाईभक्तांनो, समाजाचं दुःख, ते आपलं दुःख, समाजाचं हित, ते आपलं हित, असं जे मानतात, त्यांना धर्म, जात नसते. त्यांचा धर्म असतो, तो समाजाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचा व जात असते, ती दीन-दुबळ्यांसाठी, गोरगरीबांसाठी सतत तळमळीने कार्य करण्याची. असं विलक्षण व्यक्तिमत्व सत्पुरुषांच्याठायी असतं. सर्व धर्मांतील, सर्व जातींतील दुःखी लोक त्यांना समान असतात. त्यांच्यात ते भेदभाव करीत नाहीत. आणि म्हणूनच की काय, साईबाबांनी आपल्या धर्माचा, जातीचा कुणा कुणाला म्हणून थांगपत्ता लागू दिला नाही. बाबांच्या हयातीत अनेक भक्तांना याबद्दल कुतुहल वाटायचं. अनेक तर्क-वितर्क केले जात. पण ते सारे निष्फळच ठरत. बाबांना जर का यवन म्हणावं, तर त्यांचे हिंदूधर्माप्रमाणे कान टोचलेले होते, मशिदीत सदैव अग्नि जळत असायचा, हिंदूधर्मातील अनेक ग्रंथांचं ते वाचन करुन घ्यायचे, त्यांवर भाष्यही करायचे, हनुमान त्यांचे कुलदैवत असल्याचेही साईबाबांनी श्री साईसत्‌चरितात म्हटले आहे, हिंदू म्हणावे, तर त्यांची यवनांसारखी सुंता झालेली होती, मशिदीत त्यांचा सदा निवास असायचा, मुखात ''अल्ला मालिक''चा सतत जप असायचा. आपल्या भक्तांमध्ये त्यांनी कधीही भेदभाव केला नाही. त्यांच्या भक्तगणांत जसे हिंदू होते, तसे मुसलमानही ; जसे श्रीमंत होते, तसे गरीबही अनेकांना

त्यांनी त्यांच्या कुलदैवताच्या, उपास्यदैवताच्या रुपात दर्शन दिले. आजही ते त्यांनी घालून दिलेल्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या भक्तांकरिता संकटसमयी धाव घेतात, मग तो भक्त कोणत्याही धर्माचा असो वा कुठल्याही जातीचा. असे हे साईबाबा भगवंताचे विलक्षण अवतारच म्हणायचे.

- तुमचा बालसाईभक्त सवंगडी

# भक्ताचा आनंद हा बाबांचा आहार

बालसाईभक्तांनो, बालपण हे भक्तीचे मोल जाणून घेण्याचे खरे वय होय! भक्त प्रल्हाद, ध्रुवबाळ वगैरेंनी बालपणीच देवाची भक्ती करण्यास सुरूवात केली होती आणि म्हणून ती चांगल्याप्रकारे फळासही आली होती. तुम्हीसुद्धा तुमच्या बालपणाचा वापर श्री साई-रामाची भक्ती करून आपले जीवन यशस्वी करण्याचा कसून प्रयत्न करा. भक्ती ही यश मिळविण्याची गुरुकिल्ली होय! ही बहुमोलाची किल्ली तुमच्याजवळ असल्यास यशोमंदिर तुमच्यासाठी नेहमीच खुले राहील.

सद्बुद्धी व मंगल विचार हे आपणा सर्वांचे दोन पंख होत. या पंखांच्या विश्वासावर तसेच बळावर आपण उंच आकाशात भरारी घेऊन विवेक-सौंदर्य नेहमीच पाहू शकतो. यामुळे आपले मन सदा प्रसन्न राहू शकते. मनाची प्रसन्नता आपणास भयापासून दूर ठेवते. निर्भय मन कोणत्याही प्रसंगी आनंदी राहू शकते. आपला हा निर्मळ आनंद थेट श्री साई-रामाची भेट घडवून आणत असतो. आपला हा आनंद म्हणजे श्री साईबाबांचा खरोखरी आहार होय!

बाबा लौकिकात राहून अलौकिक बनले, त्याचे रहस्य आपणास यात गवसते. आपण आपल्या शरीराच्या आरोग्यासाठी सकस अन्न सेवन करतो, हे तर चांगलेच आहे. परंतु शरीराबरोबर आपण आपले मनसुद्धा सद्विचारांनी सुदृढ राखले पाहिजे.

सद्बुद्धीसाठी आपण गायत्री-मंत्र म्हणून सूर्योपासना करीत असतो. गायत्री ही बुद्धीची देवता होय! बुद्धीबरोबर आपली वाणी (वाचा) शुद्ध असली पाहिजे. वाणीची शुद्धता राखण्यास आपण देवी सरस्वतीची पूजा करीत असतो. म्हणून वाणीची देवता सरस्वती होय! सत्यवानाची पत्नी सावित्री ही आपल्या पतीवर हृदयापासून प्रेम करीत असे. म्हणून सावित्री ही हृदय-देवता होय! बालसाईभक्तांनो, तुम्ही या तीन देवतांचे म्हणजे गायत्री, सरस्वती व सावित्री यांचे रोज स्मरण करीत रहा; म्हणजे तुमचे जीवन

शुद्ध व पवित्र राखले जाईल.

बालसाईभक्तांनो, आपली सद्‌बुद्धी हीच आपली प्रतिभा होय! प्रतिभा जागृत ठेवली म्हणजे सद्‌विचार-सदाचार सदा आपल्या सेवेला तत्पर राहतात. त्यांची सेवा फुकट जावू नये म्हणून सद्‌विचारांची शब्दामध्ये गुंफण करावी व अशी तयार झालेली शब्द-सुमनमाला, श्री साईचरणी नेहमी अर्पण करावी. सदाचार अंगी बाळगून कुटुंब-मंडळीस, तसेच आपल्या मित्र-मंडळीस सुखवावे. जीवन सुखी करण्याचा हा मूलमंत्र आहे. जीवन सदा सुखी असले म्हणजे दसरा-दिवाळी यांसारख्या सणांची वाट पाहत बसावी लागत नाही. आपल्या आयुष्यातील प्रत्येक दिवस हाच मग सण बनतो. सणाच्या दिवशी मिळणारा आनंद हा आपला रोजचाच आनंद बनतो. हा आनंदाचा नैवेद्य आपण रोज श्री साई-रामाला दाखवित जावा, म्हणजे त्याच्यावर कधीच उपाशी राहण्याची पाळी येणार नाही. श्री साईराम सुखी तर आपणही सुखीच राहू शकतो.

- श्री. शाम जुवळे
दादर (प.), मुंबई.

## शब्द शोध क्र. ६

| | | | |
|---|---|---|---|
| बै | | दा | |
| रा | क्ष | स | |
| गी | | बों | र |
| | व | ध | |

मागील शब्दकोड्याचे उत्तर

# साई तारी त्याला कोण मारी

- सौ. शशिकला भास्कर सोनावणे
कुर्ला (पूर्व), मुंबई.

सुरक्षित तो, ज्याला प्रभूचे रक्षण लाभते।
तरुन तो जातो, ज्याच्यावर प्रभूची कृपा असते॥

भक्तीमध्ये शक्ती असते; प्रभूची कृपा, प्रभूचे मार्गदर्शन, प्रभूचे सहाय्य हे सर्व भक्तीमार्गातून प्रगट होतात. याचा अनुभव मला गुरुवार, दिनांक १८ मे १९८९ रोजी दुपारी साडेचार वाजता झालेल्या घटनेवरून आला. तो अनुभव माझ्या मनावर कायम कोरून राहिला आहे.

माझी दीड वर्षाची मुलगी श्रद्धा शौचविधी करण्यासाठी म्हणून घरातील शौचालयात गेली. सवयीप्रमाणे तिने पाणी भरून बादली नेली होती. काय झाले कुणास ठाऊक! बादली पाडल्याचा जोरदार आवाज झाला. त्या आवाजाने हातातले काम जसेच्या तसेच टाकून मी शौचालयाकडे धाव घेतली. दार उघडून पहाते तर काय, माझी श्रद्धा शौचालयात उपडी झालेली व तिच्यावर पाण्याने भरलेली बादली पडलेली. तिचे डोळे पॉटच्या छिद्राजवळ होते. मला तर हा प्रसंग पाहून काहीच सुचेनासे झाले. थरथरतच मी तिला हळूहळू ओढून बाहेर काढले. त्यानंतर ती रडू लागली; कारण तिला आतमध्ये ओरडण्यास किंवा रडण्यास मुळी वावच नव्हता. वरून पाणी पडल्याने ती अगदी गुदमरल्यासारखी झाली होती. प्रथम मी तिचे शरीर संपूर्ण स्वच्छ करून घेतले व नंतर पाहिले, तर तिच्या शरीरावर एकही जखम अथवा साधा ओरखडाही नव्हता. ही किमया बाबांशिवाय कोणाची असणार! आम्ही त्यांची जी काही थोडीफार भक्ती करतो, त्या भक्तीची हाक कानी पडताच ते सत्वर भक्ताच्या रक्षणासाठी धाव घेतात. नाहीतर असे घडणे शक्य नाही.

# भ्रष्ट समाज त्रस्त भक्त-श्रींची भक्ती एक दिलासा

- श्री. अनिल केशवराव रसाळ
वडाळा (पूर्व), मुंबई.

श्रींचे भक्त असंख्य आहेत. त्यांच्या समस्या विविध असून त्या समस्यांची सोडवणूक श्री निरनिराळ्या प्रकारे करीत असतात. समस्यांची उकल किंवा त्यासाठी सांगितलेली उपासना करताना काही पथ्यं श्रींनी भक्तांना घातलेली आहेत. त्यांतील मुख्य पथ्यं म्हणजे सत्यप्रियता, निर्लोभवृत्ती, निरहंकारी आचार व सूडप्रवृत्तीचा अभाव ही आहेत.

थोडक्यात, श्रींच्या भक्तीचा उच्च प्रकारचा अनुभव किंवा जटील समस्यांचा उकल काही पथ्यं पाळून केलेल्या उपासनेनंतरच येतो. निखळ भक्तीने येणारे उच्च कोटीतील पारमार्थिक अनुभव मिळण्यासाठी तळमळणाऱ्या भक्तांना तर फारच मोठ्या कसोट्यांना तोंड द्यावे लागते. परंतु अशा भक्तांना प्रथम सर्वप्रकारच्या प्राथमिक पथ्यांचा अवलंब केल्यानंतरच पारमार्थिक अनुभवांची तळमळ लागते. परंतु या लेखाचा विषय तो नसल्याने त्याविषयी न लिहिता पथ्यं पाळताना येणाऱ्या अडचणींविषयी व त्यांच्या स्वरूपांविषयी पाहू! मग त्या कशा निवारता येतील, ते पाहू.

आज वरील सर्व पथ्यांना प्रतिकूल असं वातावरण आहे. कारण सर्व क्षेत्रांत, सर्व ठिकाणी आदर्श विचार व आचार करणाऱ्या व्यक्तीला नेस्तनाबूत करण्याचे प्रयत्न अतिशय संघटीतपणे होतात. त्यामुळे त्या आदर्श विचारांचा आचार करण्याचे मनोधैर्य बहुतेक लोकांमध्ये अजिबात नसते. बरं, ते असलेच तरीसुद्धा कुटुंब चालवणाऱ्या भक्ताला इच्छा असूनही तो आचार काही वेळा होणारा त्रास लक्षात घेऊन बाजूला ठेवावा लागतो. तसं केल्यास श्रींची कृपा कमी होते. त्यामुळे त्याची गत एखाद्या कात्रीत सापडल्यासारखी होते. उदाहरणार्थ, तो एखादा नोकरदार आहे. ज्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणी "चिरीमिरी," "चहापाणी" अशा नावांनी ओळखली जाणारी रक्कम जर त्याने नाकारण्याचे ठरवले, तर त्याच्या सर्व सहकाऱ्यांचा त्याला पूर्ण व गुप्त असा संघटीत विरोध सुरु होतो. कारण त्याच्यावरील अधिकारीवर्गसुद्धा त्यातील काही भाग बिनबोभाटपणे गिळंकृत करीत असतो. त्यांच्याकडे तो गेला, तर त्याच्यावर अन्यायच होण्याची शक्यता असते. कारण वरील अधिकारी अगदी कायदेशीरपणे त्याची जिथे तो काम करतो, तिथून बदली करू शकतात. ही बदली जर बाहेरगावी